वर्ष : सोळावे
मे २०२४
अंक : पाचवा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

विज्ञानाबद्दल कुतूहल असणाऱ्या,
तसेच रहस्य आणि गूढतेविषयी आकर्षण असणाऱ्या
रसिक वाचकांसाठी राजहंसच्या तीन नवीन कादंबऱ्या...





**१६९५**
सुरेश वांदिले




**द सीक्रेट मिशन**
राधिका कुलकर्णी




**सवाष्ण**
डॉ. क्षमा गोवर्धने शेलार




हे आहे स्वत:च्या निर्णयानं स्वतंत्रपणे एकल
राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.
तिच्या जीवनाची निरनिराळी वळणं दाखवणारं.

मुलीचं लग्न होतं,
तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं; हे सर्वमान्य.

पण ती एकटीनं स्वतंत्रपणे राहण्याचा
निर्णय घेते तेव्हा?
तिचं जीवन कसं बदलतं? काय होतं?

## विवाह नाकारताना
विनया खडपेकर


बाईचं संघर्षमय जगणं चित्रित करणं
मराठी कादंबरीला नवं नाही...

पण बायकांचा समूह मात्र
क्वचितच कोणी रंगवला...

या कादंबरीत लहानशा खेड्यातला
बायकांचा समूह आपल्याला भेटतो.

अत्यंत ओघवत्या भाषेतली आणि
चित्रमय शैलीतली ही कादंबरी
आवर्जून वाचायला हवी.....

## बाय गं...
विद्या पोळ - जगताप



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक पाचवा
१५ मे २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!*
  – सुरेश वांदिले / ९
- गाऊ त्यांना आरती
  *भीमसेन* / १७
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *मी सखा मेघदूत* – हर्षदा पंडित / २९
- आठवणींच्या खिडकीतून
  *ओक्साबोक्शी हसवणारी नाटके*
  – माधव वझे / ३१
- क... कवितेचा : ऋतुराज वैद्य / ३५
- उद्‌गार
  *ऐसपैस गप्पा नीलमताईंशी : करुणा गोखले*
  – नीलेश मदाने / ३७
- राजहंसी पार / ४१
- वाचकांच्या मनातलं... / ४७

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत, या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे, मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)






एका सर्वसामान्य माणसाचा अनघड प्रवास. अनेकांना अडचणीतून मार्ग दाखवणारा, दिशाहीन वा नाउमेद झालेल्या तरुणाईला दिलासा मिळेल या विश्वासाने केलेला...

### फकिरी

एक अनघड प्रवास...

दत्ता बारगजे

किंमत : ₹ ३९५/- । (ट. ख. ₹ ५०)

# संपादकीय

*मनोरंजन ही माणसाची अगदी मूलभूत गरजांच्या पाठोपाठ येणारी आवश्यकता आहे. परंपरेनं अभिजात मानल्या जाणाऱ्या वाङ्मयातूनही रंजन होतं, तसंच ते लोकप्रिय साहित्यातूनही होतं आणि अशा लोकप्रिय साहित्यालाही आवश्यक तो सन्मान दिला जायला हवा, या भूमिकेतून 'राजहंस' पुढील काळात रहस्य कादंबऱ्या आपल्यासमोर सादर करणार आहे.*

नमस्कार वाचकहो,

रहस्य हा माणसांच्या जगण्याचा एक महत्त्वाचा घटक. सृष्टीमधल्या, आपल्या आयुष्यामधल्या अनेक गोष्टींबद्दल आपल्याला विलक्षण कुतूहल वाटतं, त्याचं कारणच त्या आपल्याला सहजी उलगडत नाहीत. अशी कोडी सोडवायच्या माणसांच्या धडपडीतून तर विज्ञानाच्या कित्येक शाखा निर्माण झाल्या आणि वाढल्या.

रहस्यं सृष्टीत आणि निसर्गात असतात, तशीच मानवी व्यवहारातही असतात. माणसं विशिष्ट परिस्थितीत अमुकच प्रकारे का वागतात, यासारख्या प्रश्नांचा प्रचंड शोध तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, समाजशास्त्र आणि मुख्यत: मानसशास्त्र यांनी घेतला आहे. जगभर आणि कैक शतकं तो शोध चालू आहे. पण त्यांनातरी कुठे सापडलीत निर्णायक उत्तरं? शास्त्रीय पद्धतीनं रहस्य उलगडायचा कार्यक्रम हा शास्त्रज्ञांपुरता राहतो आणि विज्ञानाच्या अभ्यासकांना तो आवर्जून शिकावा लागतो. पण माणसांच्या व्यवहारातली रहस्यं मात्र लहान-मोठ्या सर्व स्त्री-पुरुषांच्या वाट्याला येतात. काही वेळा उलगडतात, बहुसंख्य वेळेला अज्ञात राहतात. अशा अवघड कोड्यांची दखल शास्त्रांप्रमाणेच साहित्य-कलांनीसुद्धा घेणं अपरिहार्यच आहे. पाश्चात्त्य साहित्यात त्यांची दखल खूप मोठ्या प्रमाणात घेतली गेली, त्यामुळे आपण बऱ्याचदा नावं ऐकतो त्या अगाथा ख्रिस्ती, आर्थर कॉनन डॉयल, अर्ल स्टॅन्ली गार्डनर, एडगर ॲलन पो यांच्यापासून अगदी इयान फ्लेमिंग, सिडने शेल्डनपर्यंत शेकडो लेखक-लेखिकांनी इंग्लिश वाङ्मयातलं रहस्यकथांचं दालन समृद्ध केलं. गूढकथा आणि भयकथा यांचीही भर त्यात पडत गेली. त्यांच्यावर लोकप्रिय चित्रपटही निघाले. आपल्या मराठीत मात्र तुलनेनं हा सगळाच संसार अगदी

मर्यादित (खरं म्हणजे तुटपुंजा) असाच राहिला. त्याचं कारण या साहित्यप्रकाराला प्रतिष्ठित साहित्य म्हणून मुळी मान्यताच मिळाली नाही.

१९५०-६०-७०-८० या दशकांमध्ये रहस्यकथेच्या क्षेत्राला मराठीत एकदम बहर आला. बाबूराव अर्नाळकर आणि गुरुनाथ नाईक यांच्या जोडीनं इतरही अनेक लेखक पुढे आले. त्यांना प्रतिष्ठा फारशी मिळाली नाही, पण खूप मोठा वाचकवर्ग मिळाला. रत्नाकर मतकरी, नारायण धारप, दिवाकर नेमाडे यांनी गूढकथा आणि भयकथा ही दालनं समृद्ध केली. नव्यानं वाचणाऱ्या किमान दोन-तीन पिढ्यांचा ओढा मराठीकडेच राहील, याची दक्षता या मंडळींनी घेतली; हे त्यांचं मोठं काम आहे. हा सगळा अतिशय औत्सुक्यपूर्ण इतिहास 'निवडक बाबूराव अर्नाळकर' या 'राजहंस'नंच प्रकाशित केलेल्या भरघोस पुस्तकात अतिशय स्वादिष्टपणे निवेदन केलेला आहे. संपादक सतीश भावसार यांच्या संयोजनात महेश एलकुंचवार, रत्नाकर मतकरी, निरंजन घाटे, अंबरीश मिश्र, प्रतिभा रानडे, रविमुकुल, अभिराम भडकमकर, डॉ. सदानंद मोरे, कुमार केतकर आणि अरुण शेवते एवढ्या नामवंतांनी मराठी रहस्यकथा, भयकथा, गूढकथांचं जग, त्यांचे नायक आणि त्या नायकांचे निर्माते यांच्या कामगिरीचा यथायोग्य गौरव केलेला आहे. ६७० पानांच्या राजहंसच्या या लक्षणीय पुस्तकाची तिसरी आवृत्ती अलीकडेच संपली. आवर्जून संग्रही ठेवावं असं हे पुस्तक आहे.

आज या सगळ्या गोष्टींची आठवण व्हायचं कारण असं की, एप्रिल २०२४ या एका महिन्यातच राजहंस प्रकाशनानं तीन उत्तम नवीन कादंबऱ्या प्रकाशित केलेल्या आहेत, आणि त्यांमध्ये विज्ञान, रहस्य आणि गूढता यांचा सुंदर संगम पाहायला मिळेल. याची पार्श्वभूमी अशी की, सुमारे एक वर्षापूर्वी 'राजहंस'नं 'कुमार विज्ञानकादंबरी स्पर्धा' आणि 'रहस्य-सन्मान कादंबरी स्पर्धा' अशा दोन स्पर्धा जाहीर केल्या होत्या. त्यामागे उद्देश होता तो हाच की, मराठीत रहस्यकथा, गूढकथा, भयकथा यांना गेली सुमारे तीन दशकं जी ओहोटी लागलेली आहे, तिच्यावर काही उपाय होईल का? एका स्पर्धेनं सगळं चित्र बदलेल असा भ्रम नाहीच. पण नवे विषय, वेगळा आशय आणि ताज्या दमाचे लेखक शोधत राहणं, हा तर राजहंसचा श्वासच. आणि एके काळी या तीन प्रकारच्या कथांना प्रचंड वाचकवर्ग लाभत असे मराठीत. तसंच पुन्हा होऊ शकेल का, या उत्कंठेतून स्पर्धा आयोजित केली गेली. स्पर्धांसाठी आलेल्या कादंबऱ्यांचं परीक्षण ज्येष्ठ लेखक श्री. सुबोध जावडेकर आणि श्री. रवींद्र गुर्जर यांनी केलं. यात कुमार-किशोर वाचकांसाठी विज्ञान कादंबरी लिहिणारे मुंबईकर लेखक श्री. सुरेश वांदिले यांची '१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!' ही नावापासूनच उत्सुकता वाढविणारी कादंबरी कुमार विज्ञान कादंबरी स्पर्धेत पहिल्या बक्षिसाची मानकरी ठरली. संपादकीय संस्कार होऊन

गेल्या महिन्यात राजहंसनं ती प्रकाशित केली.

रहस्य-सन्मान कादंबरी स्पर्धा ही कै. बाबूराव अर्नाळकर व कै. गुरुनाथ नाईक या दिग्गज रहस्यकथा लेखकांच्या सन्मानार्थ घोषित केली होती आणि त्यात पहिल्या पारितोषिकाचा मान 'सवाष्ण' या डॉ. क्षमा गोवर्धने शेलार (वेल्हा, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे) यांच्या कादंबरीनं पटकावला, तर राधिका कुलकर्णी (भुवनेश्वर, ओडिशा) यांच्या 'द सीक्रेट मिशन' या कादंबरीनं दुसरं पारितोषिक मिळवलं. यांपैकी '१६९५...' या कादंबरीविषयी परीक्षक श्री. सुबोध जावडेकर यांनी व्यक्त केलेलं मनोगत व या कादंबरीचा परिचय अंकात स्वतंत्रपणे वाचायला मिळेल. तसंच परीक्षक रवींद्र गुर्जर यांचं मनोगत आणि इतर दोन कादंबऱ्यांचा परिचय पुढील अंकांमध्ये आपल्याला क्रमश: वाचायला मिळेल.

'१६९५...' या कादंबरीबद्दल उत्कंठा वाटते ती अगदी नावापासूनच. सतराव्या शतकाचा खलनायक औरंगजेब बादशहा, विसाव्या शतकात जन्माला आलेला स्मार्ट रोबो उर्फ यंत्रमानव आणि त्याची मदतनीस अलेक्सा व एकविसाव्या शतकात अजून विकसित होत असलेलं कृत्रिम बुद्धिमत्तेचं (आर्टिफिशियल इंटेलिजन्स - एआय) तंत्रज्ञान या तीन गोष्टींची सांगड लेखकांनी कशी घातली असेल? विशेष असं की, पंधरा वर्षं वयाचा दहावीचा चुणचुणीत विद्यार्थी टिल्लू रामचंद्र रणखांबे हा आहे या कादंबरीचा नायक! प्रा. स्पॉट मेलन हा बुद्धिमान यंत्रमानवही कादंबरीत एखाद्या पात्रासारखाच वावरतो. संगणकशास्त्राचे प्राध्यापक असलेले टिल्लूचे वडील प्रा. रामचंद्र रंगनाथ रणखांबे, सारख्या नवनवीन कल्पना सुचवणाऱ्या आणि त्यांच्या मागे धावणाऱ्या आपल्या मुलाची क्षमता कशी-किती ओळखतात आणि ती विकसित करायचा प्रयत्न कसा करतात, हे पालकांनीही आवर्जून वाचण्यासारखं आहे. फक्त १४४ पानांची ही कादंबरी प्रामुख्यानं विज्ञान कादंबरी असली, तरीही लेखकानं चातुर्यानं तिला शेवटापाशी 'क्राइम थ्रिलर'ची चरचरीत फोडणी देऊन झकास रंगत आणली आहे... औरंगजेबाच्या जहाजावर पडलेला दरोडा आणि पुढेही सुरू राहिलेली सागरी चाचेगिरीची मालिका यातून लुटल्या गेलेल्या संपत्तीचा शोध टिल्लूला यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनं लावता येतो का, हा यक्षप्रश्न कादंबरी पूर्ण वाचूनच वाचकांनी सोडवायला हवा. या कादंबरीचा सीक्वलही पुढे-मागे लिहायचं लेखकांनी मनावर घेतलं, तर व्यक्तिश: मला आनंदच होईल.

'सवाष्ण' ही वेगळीच कादंबरी आपल्याला विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच घेऊन जाते. जुन्या धाटणीचं एक छोटं गाव, तिथला सधन वतनदार घराण्याचा वाडा, त्यांच्या कुटुंबात घडलेल्या बऱ्या-वाईट घडामोडी, त्यांचे परिणाम आणि एका पीडित स्त्रीच्या शापामुळे मिळालेली भीषण कलाटणी; हा सगळा कथाभाग

आजच्या वाचकांना अनोखा आणि म्हणूनच आकर्षक वाटणारा आहे. ही कादंबरी माझ्या लक्षात राहील ती लेखिका डॉ. क्षमा यांच्या चपखल शब्दकळा आणि अप्रतिम वर्णनशैलीसाठी. त्यातूनच त्यांनी दगडी वाडा, त्याभोवतालची बाग आणि त्यातला घराण्याचा शुभचिंतक असलेला नाग यांनाही जणू जिवंत पात्रांसारखं कादंबरीत खेळवलं आहे. कादंबरीतल्या समर्थ स्त्रियांच्या व्यक्तिरेखा विलक्षण ताकदीनं रंगवल्या आहेत. कादंबरी संवादरूपानं पुढे जात राहते. त्यामुळे तिच्या २४० पृष्ठांतल्या कथानकाला वेगवान ओघ आला आहे. कादंबरीच्या शेवटापाशी लेखिकेनं रहस्याला गूढतेची अप्रतिम झिलई दिली आहे. काहीशा अतींद्रिय अनुभवांच्या कक्षेतही ती वाचकांना घेऊन जाते. एकूणच वाचकाला गुंतवून, गुंगवून ठेवणारी ही कादंबरी आहे.

एप्रिलमधली 'राजहंस' प्रकाशनाची तिसरी कादंबरी आहे ती राधिका कुलकर्णी यांची 'द सीक्रेट मिशन'. रहस्य-सन्मान स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवलेली ही कादंबरी, ही लेखिकेची पहिलीच कादंबरी आणि पहिलंच प्रकाशित पुस्तक. पण १६४ पानांची ही कादंबरी तुम्ही वाचायला लागलात की चटकन खाली ठेवायला मन होणार नाही, इतकी ती तुम्हाला धरून ठेवील. हे कथानक चालू काळातलं आहे आणि शुद्ध रहस्य कादंबरी म्हणता येईल अशी ती आहे. अनेक कोडी लेखिकेनं आपल्या कल्पनाशक्तीनं निर्माण केली आहेत आणि त्यांची चोख, तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक उत्तरंही शेवटापाशी दिलेली आहेत. मर्दानी इन्स्पेक्टर धनेश आणि त्याची धीट, देखणी प्रेयसी दूर्वा यांच्या प्रेमकहाणीचं मुलायम अस्तर कादंबरीला अधिकच रोमांचक बनवतं. यानंतरच्या काळातही या जोडीच्या काही साहसी करामती लेखिकेनं आपल्यापुढे आणायचं ठरवलं, तर मला नवल वाटणार नाही.

मनोरंजन ही माणसाची अगदी मूलभूत गरजांच्या पाठोपाठ येणारी आवश्यकता आहे. परंपरेनं अभिजात मानल्या जाणाऱ्या वाङ्मयातूनही रंजन होतं, तसंच ते लोकप्रिय साहित्यातूनही होतं आणि अशा लोकप्रिय साहित्यालाही आवश्यक तो सन्मान दिला जायला हवा, या भूमिकेतून याआधीही राजहंसनं 'चाल आणि मात' (लेखक : हेमंत गोडसे, जानेवारी २०२३) हा तीन दर्जेदार रहस्यकथांचा संग्रह प्रकाशित केला होता. या साहित्यप्रकाराकडे वाचकांचं लक्ष वेधत राहावं, या उद्देशानं या वर्षअखेरीपर्यंत आणखी तीन (अनुवादित) रहस्य कादंबऱ्या आम्ही आपल्यासमोर सादर करणार आहोत... या रंजक साहित्याला वाचकवर्गाकडून यथायोग्य प्रतिसाद मिळत राहावा, अशी मन:पूर्वक प्रार्थना आहे.

***शिरीष सहस्रबुद्धे,*** 'राजहंस' संपादक

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!

*'१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!' ही कादंबरी 'राजहंस'ने नुकतीच प्रकाशित केली. सुबोध जावडेकर यांचं या कादंबरीविषयीचं मनोगत आणि या कादंबरीचे लेखक सुरेश वांदिले यांनी करून दिलेला कादंबरीचा हा परिचय.*

'राजहंस'ने आयोजित केलेल्या, 'कुमारवयीन वाचकांसाठी विज्ञानकादंबरी' लिहिण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणारी '१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!' ही सुरेश वांदिले लिखित कादंबरी कुमार वाचकांनाच नाही, तर प्रौढ वाचकांनाही रंजक वाटेल अशी आहे. कादंबरीचे कथासूत्र फार विलक्षण आहे.

इसवी सन १६९५मध्ये औरंगजेबाच्या मालकीच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घ्यायचा प्रयत्न आज एक प्राध्यापक आणि त्याचा पंधरा वर्षांचा हुशार मुलगा करतात, त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून घेतात; ही कल्पनाच मुळी अफलातून आहे. विज्ञान कादंबरी असली, तरी लेखकाने तिच्यात तांत्रिक माहितीचा भडिमार केलेला नाही. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि यंत्रमानव यांबद्दलची माहिती कादंबरीत अधूनमधून येते, पण ती जरूर तेवढीच आणि निवेदनाच्या ओघात येते. वाचकाचे कुतूहल जागृत व्हावे, पण त्याला अडखळायला होऊ नये; अशा बेताने. कादंबरीतील व्यक्तिरेखा ठसठशीत उतरल्या आहेत. संवाद सहजसुंदर आहेत. विज्ञान अचूक आहे आणि रहस्य वाचकाला शेवटपर्यंत बांधून ठेवते. त्यामुळे पुस्तक एकदा हातात घेतले, की संपूर्ण वाचून होईपर्यंत खाली ठेवता येत नाही.

***सुबोध जावडेकर***

**१.**

सप्टेंबर १६९५मध्ये, 'गंज-ई-सवाई' जहाज लुटलं गेलं. ते हज यात्रेवरून हिंदुस्थानात परत येत होतं. आलमगीर औरंगजेबाच्या मालकीच्या या जहाजातून त्याचे कुटुंबीय आणि सरदार घराण्यातील व्यक्ती हज यात्रेला गेल्या होत्या. परत येताना त्यांनी, सोने-चांदी-दागिने-हिरे-मोती यांची मोठी खरेदी केली. हिंदुस्थानातून जातानासुद्धा या शाही राजघराण्यातील व्यक्तींच्या इतमामाला साजेशी प्रचंड संपत्ती या

जहाजात होती. साहजिकच या जहाजाच्या संरक्षणाची चोख खबरदारी घेण्यात आली होती. सैन्य, तोफगोळे, बंदुका जहाजावर भरपूर होत्या. अशा शाही जहाजावर हल्ला करून ते लुटण्याचं धाडस करणं हे स्वत:हून तोफेच्या गोळ्यासमोर जाण्यासारखं होतं.


मात्र हे धाडस, हेन्री ॲव्हेरी या समुद्री चाच्यानं केलं. या दरोड्याची कल्पना आणखी दोन-तीन सागरी चाच्यांना त्यानं सांगितली. सर्वांनी हे वेडं धाडस करण्याचं मान्य केलं.

■ ■ ■

'गंज-ई-सवाई'नं मोठं अंतर कापलं होतं. सुरत बंदर जवळ येऊ लागलं. आतापर्यंतचा प्रवास विनात्रासच झाला होता. त्यामुळे यापुढे फार धोका नाही असं वाटल्यानं जहाजावरील सुरक्षासैनिक शिथिल झाले. डोळ्यांत तेल घालून सुरक्षेकडे लक्ष देण्याचं सोडून ते मौजमस्तीत सामील झाले. अशी गाफील अवस्था असताना हेन्री ॲव्हेरी आणि त्याच्या साथीदारांनी जहाजावर हल्ला केला. जहाजावरच्या सुरक्षासैनिकांना प्रतिकार करता आला नाही.

हे जहाज ताब्यात आल्यावर तेथील अफाट संपत्ती बघून ॲव्हेरी आणि त्याच्या साथीदारांचे डोळे विस्फारले. सगळीकडे सोने-चांदी-मोती-हिरे-दागिने, इतर मौल्यवान धातू, तत्कालीन चलन अशी विपुल संपत्ती! हे जहाज या चाच्यांनी एका बंदराजवळ थांबवलं. त्यातली संपत्ती बाहेर काढायलाच त्यांना सात दिवस लागले. त्यांची जहाजं या संपत्तीनं भरून गेली. चाच्यांनी गंज-ई-सवाईची मोडतोड केली. प्रवासी आणि सैनिकांची कत्तल करून जहाज सोडून दिलं. अलोट संपत्तीनं भरून गेलेल्या आपल्या जहाजांतून चाचे पसार झाले.

औरंगजेब बादशहा तेव्हा जगातल्या शक्तिशाली सम्राटांपैकी एक होता. आपल्या जहाजावर हल्ला करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना कठोर शिक्षा देण्याची औरंगजेबानं घोषणा केली.


राजगादीसाठी नारायण पेशव्यांचा खून.
ही कहाणी आहे मराठी साम्राज्यातल्या कलहाची,
हताशेची, रणनीतीची आणि पराक्रमाची.
धूर्त इंग्रजांच्या कपट-कारस्थानांची.

द्रोहपर्व

अजेय झणकर

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ४५०/- । (ट. ख. ₹ ५०)

अ‍ॅव्हेरी हा इंग्रज असल्यानं, तेव्हा हिंदुस्थानात बस्तान बसवू पाहणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीला औरंगजेबानं धारेवर धरलं. अ‍ॅव्हेरीशी आपला काही संबंध नसल्याचं कंपनीनं सांगितलं. मात्र, औरंगजेब काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. त्यानं हिंदुस्थानातल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारावर निर्बंध आणण्याची कार्यवाही सुरू केली.

कंपनीच्या विस्तारासाठी औरंगजेबाचं हे पाऊल घातक असल्यानं अखेर अ‍ॅव्हेरीला पकडून देण्याचं कंपनीनं कबूल केलं. त्यासाठी जगातल्या विविध भागांत सैन्य पाठवलं. पण या मोहिमेत अ‍ॅव्हेरी सापडलाच नाही. त्याच्याशी संबंधित काही माणसं कंपनीनं पकडली खरी, पण ती त्याची नसल्याचं नंतर सिद्ध झालं. औरंगजेबाची नाराजी अधिक वाढू नये म्हणून कंपनीनं त्याला काही लाख रुपयेही देऊ केले. पण ते त्यानं घेतले नाहीत. त्याला हवा होता फक्त अ‍ॅव्हेरी. मात्र तो तर सापडत नव्हता.

गेला कुठे असेल हा अ‍ॅव्हेरी?

ईस्ट इंडिया कंपनीला प्रश्न पडला. कंपनीनं खूप शोधाशोध केल्यावर त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न सोडून दिला. आश्चर्य म्हणजे पुढे औरंगजेबानंही अ‍ॅव्हेरीबाबत जराही खळखळ केली नाही.

▪ ▪ ▪

## २.

‘असं कां बरं झालं असावं?’ टिल्लू रामचंद्र रणखांबेला प्रश्नच पडला. चुणचुणीत टिल्लू दहावीत शिकतो. त्याचे बाबा संगणकशास्त्राचे प्राध्यापक, तर आई इतिहासाची प्राध्यापक.

टिल्लूला, आर्टिफिशिअयल इंटेलिजन्स (एआय) - मशीन लर्निंग - नॅचरल लँग्वेज प्रोसेस अशा आधुनिक शास्त्रात बराच रस. त्यामुळे, ‘एआयनं सुपर स्मार्ट झालेल्या रोबो आणि अलेक्साच्या मदतीनं, अ‍ॅव्हेरीचा आणि गंज-ई-सवाईवरील

शिवकालातील अस्सल संदर्भ, वर्तमानातील
वास्तव प्रवृत्ती अन् या पार्श्वभूमीवर विणलेलं
ऑथेंटिक, अनबिलीव्हेबल आणि
अनपुटडाउनेबल अस्सल मराठी थ्रिलर!

शोध

मुरलीधर खैरनार




आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

संपत्तीचा शोध घ्यायचा का?' अशी कल्पना तो त्याचे बाबा प्रा. रणखांबे यांच्याकडे मांडतो. ही वेडगळ वाटणारी कल्पना प्रा. रणखांबे उचलून धरतात. त्यांच्या संस्थेच्या संगणक प्रयोगशाळेतील सुपरस्मार्ट रोबो प्रा. स्पॉटला ते माहितीच्या महाजालातून औरंगजेबाचा अभ्यास करायला सांगतात. ॲव्हेरीविषयी जेवढी माहिती मिळते, तेवढी ते प्रा. स्पॉटला फीड करतात.

प्रा. रणखांबे ज्या शिक्षणसंस्थेत संगणक विभागाचे प्रमुख असतात, त्या संस्थेनं अमेरिकेतील कार्नेजी मेलन या विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाशी सामंजस्य करार करून हा प्रा. स्पॉट आणलेला असतो.

मशिन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेस अशासारख्या तांत्रिक कौशल्यात प्रचंड गती असलेला प्रा. स्पॉट, औरंगजेबाच्या अभ्यासाला लागतो. माहितीच्या महाजालात मिळालेल्या लाखो पृष्ठांचा अभ्यास करून तो औरंगजेब-ॲव्हेरी आणि जहाजावरील संपत्तीच्या रहस्यापर्यंत येतो...

आणि अकल्पित घडतं!

संस्थेच्या प्रयोगशाळेतून प्रा. स्पॉटची चोरी होते. या चोरीच्या संशयाची सुई वारंवार संस्थेच्या संस्थापक अध्यक्षांकडे वळते.

असं घडू शकतं, हे टिल्लूला वाटतं. तर 'संस्थेच्या अध्यक्षांच्याच मालकीचा असलेला रोबो ते का चोरतील?' असा प्रश्न डॉ. रणखांबेंना पडतो.

हा तिढा सुटण्याची चिन्हं नसताना बेंगळुरूकडे जाणाऱ्या महामार्गावर संस्थेच्या अध्यक्षांच्या मोटारीला भीषण अपघात होतो. त्यात ते मृत्युमुखी पडतात. या अपघाताच्या पंचनाम्यामध्ये प्रा. स्पॉटचे अवशेष अपघातग्रस्त गाडीत आढळतात.

रणखांबेंसाठी हा मोठा धक्का असतो. आता हे प्रकरण पोलिसांकडे सुपुर्द कराच, असा आग्रह सौ. रणखांबे धरतात. टिल्लू आणि प्रा. रणखांबे यांना ते पटतं. सुदैवानं, पोलीस आयुक्त रणखांबेचे मित्रच निघतात. ते त्यांच्या पद्धतीनं तपासाला लागतात.

या तपासातून भयावह रहस्यं बाहेर येऊ लागतात.

संस्थेच्या अध्यक्षांच्या कारला अपघात होतो की घातपात? त्यांच्या कुटुंबातल्या कुणाचा छुपा हात असतो का त्यामागे? धक्कादायक बाब म्हणजे, अध्यक्षांच्या घरी एका गुप्त दालनात प्रा. स्पॉट दडवलेले आढळतात. मग, अध्यक्षांच्या गाडीत ज्या प्रा. स्पॉटचे अवशेष सापडले तो कोण होता?

■ ■ ■


## ३.

कार्नेजी मेलन विद्यापीठातले संगणकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. गुप्ता हे प्रा. रणखांबे यांचे मित्र असल्यानं, प्रा. स्पॉटला आणि त्याची मदतनीस असलेल्या अलेक्साला काही धोका उद्‌भवू नये म्हणून, ते कार्नेजी मेलन विद्यापीठात दोघांचाही क्लोन करण्याची विनंती डॉ. गुप्तांना करतात. त्यानुसार प्रा. स्पॉटचा क्लोन तिथे

**अभिनंदन!**

## विविध संस्था, मानकरी ‘राजहंसी’च

### महाराष्ट्र साहित्य परिषद २०२४



निर्मला मोने पुरस्कार

**हिरवी पोर्ट्रेट्स**

पुरुषोत्तम बेर्डे





अखिल भारतीय
मराठी बालकुमार
साहित्य संस्था

वा. गो. आपटे पुरस्कार

कुंडल कृष्णाई
प्रतिष्ठान

राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय
(बालसाहित्य) पुरस्कार




**जादुई दरवाजे**

फारुक काझी



## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



पाच वर्षांच्या मुलाच्या नजरेतून उलगडणारी ही कथा!
त्याच्या व त्याच्या आईच्या नजरकैदेची व्यथा
आणि सुटकेची वास्तवकथा म्हणजे...

### बंदिवान

#### नजरकैदेची व्यथा आणि सुटकेची कथा

एमा डोनाह्यू । अनुवाद : वसुधा जोशी


किंमत : ₹ ५२५/- । (ट.ख. ₹ ५०)

आधुनिक तंत्रांचं विविध निकषांवर कठोर परीक्षण करून
त्यांची घातकता दाखवून देणारं हे पुस्तक :
'समुचित' तंत्रांच्या संयमित वापराकडे जाण्याची
आवश्यकता प्रतिपादन करणारं...

### तंत्र-मुक्ती

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)







तत्त्वांशी तडजोड न करण्याची सचोटी.
मिंधेपणा अव्हेरणारा स्वाभिमान. या बळावरच
व्यवस्थेतील भ्रष्ट मानसिकतेविरुद्ध त्यांनी लढा दिला.
ही भ्रष्ट मानसिकता कधी ना कधी नष्ट होईल,
असा आशावाद जागवणारे आत्मकथन.

### काळोखातून उजेडाकडे

#### भ्रष्टाचारी मानसिकतेशी लढा

लक्ष्मण कृष्णाजी पानसरे

किंमत : ₹ १६०/- । (ट. ख. ₹ ५०)

तयार केला जातो. रणखांबे यांच्या संस्थेतील प्रा. स्पॉट आणि डॉ. गुप्ता यांच्याकडील प्रा. स्पॉट एकमेकांशी इंटरनेटनं जोडले जातात. त्यामुळे इकडे घडणारी प्रत्येक गोष्ट तिकडे सुरक्षित होत राहते.

कार्नेजी मेलन इथे असलेल्या प्रा. स्पॉटनं प्रत्येक गोष्ट त्याच्या मेमरीत नोंदवलेली असते. इकडच्या प्रा. स्पॉटचा मृत्यू झाला असला, तरी तिकडचा प्रा. स्पॉट औरंगजेबाचा अभ्यास सुरूच ठेवतो. त्यातून अनेक धक्कादायक गोष्टी समोर येऊ लागतात. ॲव्हेरी हा पुढे औरंगजेबाचाच सरदार बनतो, हे खरं असेल का? मग त्याची समुद्रावरची चाचेगिरी सुरूच राहते की थांबते? चाचेगिरीतून मिळवलेली संपत्ती नेमकी कुठे जाते? या संपत्तीचा आणि अनेक वर्षं औरंगजेबानं महाराष्ट्रात ठाण मांडून बसण्याचा काय संबंध? लुटीच्या संपत्तीत औरंगजेब बादशहाच मुख्य भागीदार असतो का? असं असेल, तर ही संपत्ती त्यानं दडवून ठेवली तरी कुठे? प्रा. स्पॉटच्या अभ्यासातून या संपत्तीचा ठावठिकाणा लक्षात आल्यानंच तर संस्थेच्या अध्यक्षांनी त्याचं अपहरण केलं नसेल ना? त्यांच्या कारचा अपघात घडवून आणला असेल, तर त्यातून कुणाचा काय फायदा झाला? प्रा. स्पॉटनं काढलेल्या निष्कर्षांमधलं सत्य ताडून बघण्यासाठी 'ऑपरेशन बिबिकायान'ची कल्पना टिल्लूला सुचते. काय असते ही कल्पना? ती तडीला जाते का?

■ ■ ■

अशा सर्व प्रश्नांची उत्तरं '१६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!' या कुमार विज्ञानकादंबरीत मिळतील. अर्थातच, प्रा. स्पॉट म्हणतो त्याप्रमाणे, ''त्याला मिळालेल्या माहितीवर आधारित हे सगळे निष्कर्ष आहेत. ते खरे की खोटे हे आपण ठरवायचं.''

पण हे खरेच असतील किंवा खरेच निघाले तर???


❖

हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच. त्या फुलांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो, तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे, चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा


स्वानंद मुकुंद कुलकर्णी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



## नव्याने बाजारात आलेली आणि खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके

मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ५०/-




आपल्याच परिसरातल्या पक्ष्यांची ओळख करून घेण्यासाठी; निसर्गातल्या विविध प्राणी-पक्षी-वनस्पतींच्या वैशिष्ट्यांवरून विविध म्हणी आणि वाक्प्रचार कसे तयार झाले आहेत, ते जाणून घेण्यासाठी वाचू या...

### चारा खा, पाणी प्या अन् भुर्ऽऽऽ

डॉ. उमेश करंबेळकर

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)


निसर्ग हा एक अद्भुत खजिना आहे. अक्षरश: लाखो प्रकारचे सजीव निसर्गात आहेत. हे सजीव आणि त्यांचा परिसर यांची अनेक गुपिते आपल्याला ठाऊक नसतात. ती माहीत करून घेण्यासाठी वाचू या..

### निसर्ग गुपिते

डॉ. संदीप श्रोत्री

किंमत : ₹ ६०/- । (ट.ख. ₹ ५०)




विसाव्या शतकामध्ये भारतात कर्करोगविषयक संशोधनाचा पाया घालणाऱ्या संशोधिका. हाडाच्या वैज्ञानिक. नव्या पिढ्यांना प्रेरणा देणारे या वैज्ञानिकेचे चरित्र...

### सामाजिक जाणीव जपणाऱ्या संशोधिका कमल रणदिवे

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# गाऊ त्यांना आरती

‘भारतरत्न’ हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची ‘राजहंसी’ चरित्रे

## भीमसेन

*पंडित भीमसेन जोशी यांना २००९ साली ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. ‘भीमसेन’ हे वसंत पोतदार लिखित पुस्तक ‘राजहंस’ने प्रकाशित केले आहे. त्यातील ‘भीमसेन उवाच’ या प्रकरणातील हा संपादित अंश.*

पं. भीमसेन हे मितभाषी आहेत. जवळपास अबोलच. त्यालाही कारण त्यांचा गायनकलेचा ध्यास. गायनासाठी ऊर्जा राखून ठेवावी, संग्रहित करून ठेवावी हा त्यामागील हेतू असल्याचं त्यांच्या पत्नीनं मला सांगितलं.

अशी माणसं चिंतनशील असतात. जेव्हा बोलतात, तेव्हा खूप अर्थपूर्ण बोलतात. गायनकलेविषयी पंडितजींनी व्यक्त केलेले विचार शास्त्रीय संगीत गाणाऱ्या वर्तमान आणि भावी पिढ्यांसाठी जणू दीपस्तंभासारखे आहेत. त्या विचारांच्या प्रकाशात साधनेच्या मार्गावर सुरळीत चालता येणार आहे, म्हणूनच ते या प्रकरणात देत आहे.

**तंबोरा**

‘‘तंबोऱ्याचं तंत्र ते बनवणाऱ्या कुशल कारागिरांनाच अचूक ठाऊक असतं. त्यांचा व्यवसायच तो असतो. पूर्वी ओडियनच्या एका माईकवर सर्व तानपुरे ऐकू यायचे. आता तंत्रज्ञान सुधारूनही शेवटपर्यंत तंबोरे ऐकू येत नाहीत. रेकॉर्डिंग करणाऱ्याला उत्तम गाणं कळलं पाहिजे. तंबोऱ्याला किती महत्त्व आहे हे माहीत पाहिजे. तंबोऱ्याचा माईकच ऑफ करून ठेवला, तर कसं ऐकू जाणार? मी नेहमी सांगतो, एच.एम.व्ही.लादेखील सांगितलंय की, एल.पी. करताना तंबोरा शेवटपर्यंत ऐकू आला पाहिजे. तंबोरा जोरात ठेवून गाणं कसं ऐकू येतं, याचा आनंद त्या साउंडवाल्याला घेता आला, तर तो तसं करणार ना.’’

१९९९ साली पुण्यात 'तंबोरा' या विषयावर सलग तीन दिवस एक चर्चासत्र झालं. पंडितजी सर्व सत्रांना उपस्थित राहिले.

सवाई गंधर्व संमेलनात लहान-लहान गवयांचे तानपुरे पंडितजी स्वत: लावून देत असत. ते सांगतात, ''प्रत्येक तंबोऱ्यात काहीतरी दोष असतो, तो जाईपर्यंत गायकाचं समाधान होत नाही. तितका वेळ लागतोच. काही जण तंबोरे उभे धरण्याऐवजी आडवे धरतात, म्हणजे खलास.

''सुरात तंबोरा लावणं फार कठीण. सूर बरोबर लागले, तरी आसदार लागत नाहीत. जे लवकर लावतात, त्यांनाही नेहमी शाश्वती देता येत नाही की, आज लवकर लागतीलच. समव्यवसायी असले, तरी मैफिलीत एखाद्या गायकाला तानपुरा सुरात नाही, असं सांगता येत नाही.

''काही गायक जव्हारी काढताना झिरझिरझिर वाजलं पाहिजे, असा आग्रह धरतात. आमचं उलट आहे. आम्हाला गोलाई हवी असते. तंबोऱ्याचा खराखरा मजा आणि आनंद किराणा घराण्याइतका अन्यत्र क्वचितच चाखायला मिळेल. बारकाईनं ऐकलं, तर खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांच्या ध्वनिमुद्रिकांमध्ये तंबोरे किती गोल, एकवजनी, सुरेल व गंभीर वाजवलेले आहेत याचा कोणालाही प्रत्यय येईल.''

**तबला**

अनेक वर्षांपूर्वी मुंबईला रवीन्द्र भवनमध्ये कुमार गंधर्व आणि भीमसेन जोशी या दोघांची बैठक होती. दोघांच्याही तबलासाथीला वसंतराव आचरेकर होते. गायकाचा मूड आणि गायकीचं वजन यांचा तोल साधून व्यवस्थित साथ करण्यात वसंतराव मशहूर मानले जात असत. रवीन्द्र भवन श्रोत्यांनी भरगच्च झालं होतं. त्यांत मी आणि भीमसेनपुत्र जयंतही होतो. आधी कुमारजी गायला बसले, पण नेहमीसारखं गाणं रंगलं नाही. मध्यांतरानंतर भीमसेन गायला बसले. त्यांनी गाणं सुरू करून अचानक



वाचकाला मनाने, ज्ञानाने अधिक समृद्ध बनवणारी
मिस्कील शैलीतली साहित्य, कला, संगीत
यांची खुमासदार मैफील!

सांगतो ऐका...

मनोहर पारनेरकर

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

गुडघ्यावर उठत भिंगरीसारखी एक तान घेतली आणि इतके अचानक समेवर आले की, वसंतरावांनाही ते उमगलं नाही. त्यांच्याकडून फार तर पाव सेकंदाची गफलत झाली असेल, पण श्रोत्यांनी एकाच वेळी तानेला दाद आणि तबल्याबद्दल हळहळ व्यक्त केली.

– असं घारीसारखं समेवर येणं तुम्ही कसं काय साध्य केलंत, पंडितजी?


– गुरुजींकडून निघाल्यावर चार-पाच वर्षं मी जसं गाणं ऐकलं, तसा तबलाही खूप ऐकला. कंठे महाराज, किशन महाराज, अनोखेलाल, करामत-किती तरी. बनारसवाल्यांचं काय आहे की, ते फार जोरात वाजवतात. तबला चांगला वाजतो, पण बाया म्हणजे डग्गा कमजोर पडतो. याला अपवाद फक्त सामता प्रसाद. त्याच्या दोन्ही हातांत संतुलन होतं. जालंधरला चार-चार तबलजी साथीला असायचे. तबला चांगला वाजला की, एक रुपयाच्या नोटांची माळ तबलजीच्या गळ्यात घालायची तिथं प्रथा होती. मलाही घालायचे. मी लगेच तीसुद्धा तबलजीच्या गळ्यात घालायचो.

– उस्ताद अल्लारखाँ तुमचे चांगले मित्र होतेच, तिरखवाँ साहेबांशीही संबंध आला होता ना?

– खूप. असे गुणी तबलजी भेटले की, मात्रांच्या हिशेबांवरच आमचा संवाद व्हायचा. गाण्यात रंजकता कशी वाढेल, याचाच मी जन्मभर विचार केला आहे. त्यासाठी तालाचा अचूक वापर करून घेणं फार महत्त्वाचं होतं. आमच्या घराण्यात विलंबित त्रिताल कुणी गात नव्हतं, सारे एकतालात गायचे. मलाही गुरुजींनी एकतालात शिकवलं होतं. पण मी त्रितालात गाऊ लागलो; कारण त्रितालात एकतालापेक्षा रंजकता जास्त असते, लयीची गंमत अधिक करता येते. ठायलयीत गायचं असेल, तर एकताल चांगला; पण त्रितालात रंग पटकन भरतो.

– तालाबद्दल सवाई गंधर्वांनी काही खास गुरुमंत्र दिला का?

– होय. मला माझ्या गुरुजींनी ठेका धरून शिकवलं. ते स्वत: वाजवायचे. कोणत्या मात्रेवर कोणतं अक्षर आलं पाहिजे, हे समजण्यासाठी गुरुमुखातूनच मार्गदर्शन मिळतं. प्रत्येक शब्द, अमुक अक्षर अमुक मात्रेवर यायला हवं आणि एकदा जसं आलं, तसंच परत नको – हा दुसरा गुरुमंत्र दिला. जास्त रंजकता उत्पन्न करण्यासाठी व्हरायटी हवी. काहींची



किंमत : ₹ ३५०/- । (र.ब्र.₹ ५०)

समेवर यायची ठरावीक पद्धती असते. त्यात मजा नाही. आमचे गुरुजी आणि त्यांचे समकालीन जसं शिकवायचे, ते तंत्र पाळणारे आज कुणी दिसत नाहीत.

किराणा घराण्याबद्दल एक अशी भ्रामक म्हण फार पूर्वीपासून प्रचलित आहे, 'सुर गया तो सिर गया, ताल गया तो बाल गया.' त्यामुळे भीमसेन नावाचं 'पुष्पक' गगनाला गवसणी घालू लागलं; तेव्हा त्यांच्या यशानं अपचन झालेल्यांना हा मुद्दा सापडला की, 'किराण्या'चे असल्यामुळे त्यांच्यापाशी तालाची काही खास समज नसणार. या पुस्तकाचं निमित्त सोडा, मी जन्मभर पंडितजी तालात कच्चे असल्याचं अनेक तथाकथित जाणकारांकडून ऐकत आलो आहे. त्यामुळे भीमसेन चरित्रावर काम सुरू केल्यावर त्यांच्या तालज्ञानाबद्दल कुणालाही काही विचारायचं नाही, ही खूणगाठ मी मनाशी बांधली होती. तरीही सुप्रसिद्ध तबलावादक भाई गायतोंडे यांना भेटलो.


– भाई, पंडितजींच्या तालज्ञानाबद्दल तुमचं काय मत आहे?

– ते तालाचे सर्वज्ञाता आहेत. भारतभरचे तबलजी ऐकून त्यांनी तालावर परिपूर्ण प्रभुत्व मिळवलंय. बहुधा यासाठी की, किराणा घराण्यातील तालाच्या अज्ञानाचा अपप्रचार धुऊनपुसून नेस्तनाबूत करायचा त्यांचा पण असावा. पंडितजींसारखं घराण्यावरील प्रेम आजच्या काळात तरी दुर्मीळ आहे.

– त्यांच्या तालज्ञानाची गोम काय आहे?

– माझ्या दृष्टीनं त्यांची लयकारी सरळ सरळ म्हणजे उघड नाहीये. मात्रेवरून न निघता ते मधूनच निघतात. लयकारीच्या ओघातून ते कुठून उठतील, याचा अंदाज सामान्य तबलजीला येणं मुश्कील आहे.

– आणखी समजवा, भाई.

संगीत जुने असो वा नवे, 'आपले' असो वा 'त्यांचे',
शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत.
नवी-जुनी गाणी ऐकताना त्यामधील उमजलेल्या बारकाव्यांची
आस्वादकाच्या भूमिकेतून केलेली मांडणी
म्हणजे हे पुस्तक.

गाता रहे...

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

– हे पहा वसंतराव, ताना, बोलताना मारल्यावर त्याचा हिशेब मनात झाला पाहिजे. अर्ध्याच काय, पाव मात्रेतसुद्धा स्वरभरणा करता आला पाहिजे. तिथं थांबून समेवर येण्यात मजा नाही. भीमसेन तो विराम स्वरानं भरून समेवर येतात. हे मी बोलतोय चार शब्दांत. पण यासाठी गायकाला अनेक वर्षांची तपश्चर्या करावी लागते. ती भीमसेननं केली आहे. लय त्यांच्या गायकीतच नाही, अंगातही इतकी भिनली आहे की, ते तालाशी कसंही खेळू शकतात. उस्ताद अमीर खाँ यांचाही तसाच अभ्यास होता. दुर्दैव इतकंच की, त्या दोघांची नक्कल करणाऱ्यांना त्यांच्या तालज्ञानाची समज काही आली नाही.

'गायकानं बोलू नये, गावं' असं पंडितजी सांगतात. पण मुलाखत घेणाऱ्यांशी बोलावंच लागतं. अशा असंख्य मुलाखती झाल्यात. पंडितजींनी सर्वत्र जी उत्तरं दिली, ती सर्व एकाच आशयाची असल्याचं दिसून येतं. याचं कारण त्यांचा दृढ विश्वास. त्याखेरीज महत्त्वाची गोष्ट अशी – स्वभावात आणि कलेतही सच्चेपणा असल्यानं कुठल्याही शहराच्या अगर देशाच्या श्रोत्यांना खूश करण्याची चलाखी त्यांनी आजवर कधीच दाखवली नाही.

कलकत्त्याच्या एका पत्रकारपरिषदेत ते मनमोकळेपणानं बोलले. त्यात त्यांनी जवळपास सर्वच महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श केला आहे. हिंदी व इंग्रजीत झालेल्या त्या मुलाखतींचा तर्जुमा असा :

''प्रत्येक घराण्याचेच काही विशिष्ट राग असतात. दररोज कुणी नवनवे राग गात नाही. गुरुमंडळीही रोज नवे राग शिकवत नाहीत. शिकविताना सर्व जातींच्या रागांची तालीम करून घेतात. शिष्याला गायकी कशी येईल, याकडे गुरूचं लक्ष असतं. मला सकाळी तोडी, दुपारी मुलतानी, संध्याकाळी पूरिया आणि मारवा व रात्री मालकौंस

ज्यांना शास्त्रीय संगीताची गोडी आहे त्यांना आणि
ज्यांना ते कळत नाही अशांसाठीही...
हे पुस्तक केवळ वाचण्याचं नाही, ऐकण्याचंही आहे!
पुस्तकात दिलेले क्यूआर कोड स्कॅन करून
वाचक विविध रागांचा आस्वाद घेऊ शकतात.

शब्द सूर जपून ठेव...

नेहा लिमये



किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

अन् दरबारी इतकेच राग गुरुजींनी पाच वर्षांत शिकवले.


‘‘गायनाची अस्सल मेख ही आहे की, गायकाला आधी स्वत: स्वरांचा आनंद घेता आला पाहिजे; तरच तो श्रोत्यांना आनंद देऊ शकेल ना! ही मूलभूत बाब आहे. मग तुम्ही नवे गा की पुराणे.

‘‘पण तुम्हाला सांगतो, पारंपरिक राग गाण्याचा मजा काही औरच आहे. सर्वांना भावतील अशा रागांची उमर दीर्घकालिक असते, म्हणून तर ते काळाच्या ओघात टिकून राहतात. त्यांनाच म्हणायचं पारंपरिक राग. मी जरी शास्त्रीय गायक असलो, तरीही ज्या ज्या संगीतप्रकारात सच्चे सूर लागतात, ते संगीत मला आवडतं. शास्त्रीय संगीत सर्वांना आवडण्यासाठी कलावंतानं बढिया मसाला बनवला पाहिजे. सुरुवातीला काही द्रुत ऐकवलं, तर मुलांनाही मजा येते. मग झपतालाची एखादी चीज, नंतर एकताल.

‘‘ज्यांना गाणं ऐकण्याचा कानच नाही, त्यांना खरं तर शास्त्रीय संगीत आवडायलाच नको. पण आज-काल श्रोते असेही येऊन सांगतात की, ‘शास्त्र समजत नाही, पण (तुमचं) गायन कानांना गोड लागतं, मनाला शांती मिळते.’ सर्वत्र शास्त्रीय संगीताचे अभ्यासकच श्रोत्यांमध्ये असावेत, अशी अपेक्षा मी करीतही नाही.

‘‘काय? नव्या गायकांबद्दल विचारता? त्यांच्यात हवी पारदर्शक प्रामाणिकता. आजकाल तानपुरा हातात घेतल्यावर दहा नि पंधरा हजार मागायला लागतात. नव्या पिढीत चांचल्यही फार आहे. सकाळी ख्याल, दुपारी सुगम, संध्याकाळी गजल आणि रात्री ठुमरी शिकायला जातात. त्यामुळे काहीच सही येत नाही. अव्वल चीज आहे ख्याल. तो एकदा गळ्यात-मनात भिनला की, तुम्ही काहीही गाऊ शकता.

‘‘मी ऐंशी वर्षांच्या वयात गातोय, याचं तुम्ही कौतुक करता; पण खरं सांगू




मराठी गझलेच्या प्रदेशात मध्यरात्रीही तळपळणारा सूर्य
म्हणजे सुरेश भट!
त्या भटांचे गंडाबंध शागिर्द म्हणजे दीपक करंदीकर.
त्यांना लाभला गुरूंचा सोनेरी सहवास.
त्यातून साकारलेले –

**गझलसम्राटाच्या सहवासात**

दीपक करंदीकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

का? शरीर वृद्ध होतं, गायकी म्हातारी होत नाही. त्या वेळी ती थोडी येऊ लागते. गायक जेव्हा आपल्या कलेच्या परिपूर्णतेकडे पोहचू लागतो, तेव्हा तो स्वर्गवासी होऊन जातो. आजपर्यंतचा इतिहास असाच आहे. तुम्ही स्टॅमिनाबद्दल विचारलं, ती सारी गुरुकृपा आहे. आजवर जितके मानसन्मान मिळाले, त्याच्या श्रेयाचे धनी आहेत माझे गुरुजी.''

## गायकी

– गाणं वेगळं. स्वरसाधना वेगळी.

– सगळे स्वर (म्हणजे स्वरव्यंजनांपैकी), अनुनासिकं हे सर्व सारख्याच व्हॉल्यूममध्ये लागले पाहिजेत. खर्जामध्ये आणि तार सप्तकातही.

– जबडा, छाती, गळ्यातले स्नायू, स्वरतंतू या कशावरही रियाज करताना ताण येऊन उपयोगी नाही.

– ओंकारयुक्त खर्ज लावावा. यामुळे मध्यसप्तकातील स्वरांना तेज येतं. झळाळी येते. स्वरामध्ये गोलाई यायला हवी, ती यामुळे येते.

– गाण्यामध्ये जेवढी भर टाकता येईल, तेवढीच लय ठेवावी.

– किराणा घराणं म्हणजेच आसदार स्वर आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, असर करणारे स्वर.

– बारीक लहान आवाजात तान घेण्यासाठी, त्याचा रियाज मोठ्या आवाजातच करायला हवा.

समीक्षकांपासून रसिकांपर्यंत, 'पेन'सेनांपासून
'कान'सेनांपर्यंत साऱ्यांना सहप्रवासी बनवणारी;
संगीताची नवी उमज आणि नवी समज करून
देणारी एक सांगीतिक यात्रा!



गान गुणगान
एक सांगीतिक यात्रा

सत्यशील देशपांडे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

– स्टेजवर रियाज करू नये, गाणं ऐकवावं.

– रियाज करताना गतीच्या मागं लागू नये. परिणामाच्या मागं लागावं.

– स्वरांचा असर होतो आहे की नाही, याबद्दल दक्ष असावं.

– रियाज करताना सम सोडायची नाही, प्रत्येक आवर्तनात समेवर यायचंच.

– शब्द तोडायचे नाहीत. ओळ सबंध म्हणावी.

– मुख्य म्हणजे गाणं शिकलं पाहिजे.

– माझी नक्कल करून, माझे mannerisms, माझ्या phrases यांचं अनुकरण करता येईल, पण माझा मजकूर content नक्कल करून कुणाला उचलता येणार नाही. तो कोणाकडील नाही. तो दुसऱ्या कुणी का गावा? माझा मजकूर मला लखलाभ आणि दुसऱ्या कुणाचा मजकूर त्याचा त्याला लखलाभ.

– गाणारा उत्तम चोर असायला हवा.

– प्रत्येकानं सगळ्यातलं उत्तम घेऊन आपली भट्टी जमवली पाहिजे. आपलं रसायन बनवलं पाहिजे.

– इतर कलाकारांचे गुण, मला तर कधीकधी वाटतं की, त्यांच्यापेक्षा मलाच जास्त कळलेले आहेत.

– शिस्त शिकवता येते, क्रम शिकवता येतो; पण प्रतिभा कशी शिकवू? चैतन्य कसं संक्रमित करू?

– रियाज करताना गायकीकडे, स्वत:कडे आणि लोकांकडे लक्ष पाहिजे. गाण्याचा काय परिणाम होतो, याकडे लक्ष पाहिजे.

– दर दहा वर्षांनी गाणं बदलत जातं, याचं भान कलाकारानं ठेवावं.

– रियाजातसुद्धा राग बिघडता कामा नये.

– गाताना लयीशी संबंध हवा.

– नुसतंच स्वरप्रधान म्हणजे काय? काही लोकांच्या स्वरवाक्यात कॉमा सोडाच, फुलस्टॉप तरी केव्हा येणार, याची चिंता लागते. प्रस्तुतीकरणाशिवाय गायकीला मतलब नाही.

– गवयानं शास्त्रीय चिकित्सेत पडू नये.

– सरकारमान्य होणं सोपं, लोकमान्य होणं फार कठीण.

– सुरेल कलावंतानं वागण्यात बेसूर लावू नये.

– पूजेला स्वत: बसा, पुजारी ठेवणं खरं नाही.

– फक्त तालमीनं गाणं येत नाही, नजर आली की व्हरायटी साधते.

❖



# चित्र पाहीन आवडी

## रंगा माजी आकारू... सांगणारा समर्थ रोथको

*'मी चित्रकार झालो, कारण मला चित्रकला ही संगीतातील मार्मिकता आणि काव्यापर्यंत वाढवायची होती.'*

- मार्क रोथको

चित्र काढणे, अशी साधी कृती करायची म्हंटले की आपण सर्वप्रथम पेन्सिल घेतो आणि त्याने आकृतिआकार काढून मग मागाहून रंग येतात. ते कोणते, हे ठरवणे आणि रंग कसे भरायचे त्याप्रमाणे भरणे अशी कृती झाली की चित्र तयार होत जाते.

जपान, चीन, भारत, फ्रान्स, ब्रिटन आणि सर्वत्र हेच झाले आहे. बहुधा सदासर्वकाळ...

तत्त्व एकच, आधी आकार आणि मग रंगकाम... अगदी, म्हणजे युरोपातील प्रबोधन काळातील महान व्यक्तिचित्रे घेतली, किंवा आपल्याकडील नामवंत चित्रकारांची व्यक्तिचित्रे पाहिली तरी हेच दिसते. पुण्यातील चित्रकार अजय देशपांडे व्यक्तिचित्रासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची चित्रे उदाहरण म्हणून पाहू. रेखांकन, आकार पकडत जाणे आणि मग रंगांची जोड अशी पद्धत दिसून येते आणि चित्र पूर्ण होते. महान अशा भारतातील लघुचित्र परंपरेतही असाच प्रघात आहे. चिनी चित्रकलेत हेच दिसते.

प्रथम आकार, मग रंग... हे ठरलेले. असेच करायचे. इजिप्तमधील कलेपासून सर्वत्र हाच पायंडा. रंग हा चित्रातील मुख्य घटक असला, तरीही त्याचा दर्जा साहाय्यक स्वरूपाचा. आकार मुख्य आणि रंग दुय्यम. हे चित्राचे चित्र बदलले ते अमेरिकन चित्रकार आणि प्राध्यापक मार्क रोथको (१९०३-१९७०) याने.

त्याने अवकाशात प्रथम 'रंग लावणे' ही नवी पद्धत निर्माण केली. ह्या कारणाने रंग आधी आणि त्यामुळे अनायासे तयार झालेला आकार दुय्यम असा चित्रविचार मार्क रोथको याने सप्रयोग मांडला. आणि म्हणूनच 'रंगा माजी आकारू... सांगणारा समर्थ रोथको' असे प्रस्तुत लेखाचे शीर्षक आहे. रोथकोची चित्रे आपल्याला फक्त आडवी, आयताची मांडणी वाटतील आणि 'यात काय आहे?' हेही म्हणता येईल; इतकी साधी आणि सोपी आहेत. आडवे रंगीत पट्टे चित्राकार होतात आणि पाहणारी व्यक्ती फक्त रंगांचे सौंदर्य अनुभवते. जसे की निळाशार पट्टा आणि सोबतीला



लहानसा पांढरा आयतासारखा दिसणारा पट्टा.. असेच विलक्षण रंग तजेला आणि बहार आणतात. आपल्याकडे सध्या उन्हाळ्यामध्ये जसा सर्वत्र बोगनवेल, बहावा, पळस, अमलताश अशा फुलांच्या रंगांचा बहर येतो; तसे सतेजरंग त्याच्या चित्रातील पट्ट्यांचे असतात. गंध-अर्थ याला फार महत्त्व इथे नसते. तो रंगानुभव असतो. तासन्‌तास अनुभवायचा... तसेच काहीसे इथे असते. मार्क रोथकोची रंगीत चित्रे पाहणे हा अनुभव आहे. ह्या प्रकाराला अमेरिकन 'फील्ड' / 'अमूर्त चित्रे' म्हणतात.

हा अमेरिकन ज्यू चित्रकार. मार्कवरती वस्तुकला आणि निसर्ग यांचा प्रभाव होता. स्टोनहेंज, त्याप्रमाणेच त्याच्यावर 'मायकेलएंजेलोच्या लॉरेंटियन ग्रंथालय' (Michelangelo's Laurentian Library in Florence) ह्या वास्तूचा प्रभाव होता. १५५०च्या सुमारासचे हे ग्रंथालय बंद खिडक्यांसाठी ओळखले जाते. मार्क म्हणतो की, 'जसा मनुष्य बंद खिडक्या आणि दगड-विटांनी चिणलेल्या जागेत बंदिस्त असतो, तसा माझ्या चित्रात तो बंदिस्त होतो. दारे-खिडक्या बंद, बाहेर जाणे अशक्य आणि फक्त भिंतीवर डोके आपटून घेणे हातात, अशी परिस्थिती होते. चित्रातून बाहेर जाणे अवघड होऊन जाते. असा अनुभव मी देऊ पाहत असतो.' असे त्याने नोंदवले आहे. एवढी ताकद तो चित्रातील रंगात मानतो. मानवी अस्तित्वावर तो प्रश्न उपस्थित करतो.

उदाहरण पाहूयात. त्याच्या एका चित्राचे नाव, निनावी (untitled), बहुधा अनेक चित्रे ह्याच नावाची. ही चित्रे समजावून घेताना आकारातील भव्यता अनुभवावी लागते आणि रंगांची अनंतता, विस्तारणारी क्षितिजे अनुभवता येते हे लक्षात घेऊयात. चित्रातील पट्टे किंवा आडव्या आयताच्या कडा करकरीत नसून तशा धूसर असतात. प्रस्तुत लेखात लहान आकाराच्या पानावर छापलेले चित्र, मुळात लहान. पण वेबसाइटवर अनेक व्हिडिओ आहेत, ते पाहिले की 'चित्रे पाहीन आवडी' सदराचा चित्र-आस्वाद घेता येईल. इतके कष्ट कराच लोकहो.

'मला फक्त मूलभूत मानवी भावना व्यक्त करण्यामध्ये रस आहे..' असे त्याचे एक वाक्य प्रसिद्ध आहे. अमूर्त चित्रणाप्रमाणे ३०००पेक्षा जास्त केलेली शिसपेन्सिलीतील चित्रे प्रभावी आहेत. वस्तू, व्यक्ती, आजूबाजूचा परिसर त्याने चितारला आहे. लुई विथॉन कंपनीने नुकतेच पॅरिसला 'रोथको' नावानेच त्याच्या चित्रकारकिर्दीचे एक भव्य प्रदर्शन आयोजले होते. अनेक व्यक्ती, सबवे दृश्ये, नाना रचना त्याने रंगवलेली आहेत.

**खालील लिंकवर जाऊन रंगीत चित्रांचा आस्वाद जरूर घ्यावा.**

https://youtu.be/OCS2hRgF1vU?list·TLGGCPb-344OncUyMzAzMjAyNA

https://www.cbsnews.com/news/mark-rothko-paintings-on-paper/

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

या पुस्तकातील धबधब्यांच्या मनमोहक छायाचित्रांनी
हे धबधबे प्रत्यक्ष पाहावेत,
म्हणून लोकांची भटकंती तर वाढेलच;
त्याचबरोबर पुस्तकातील कलात्मक मांडणीने
वाचकांचे डोळेही सुखावतील.



महाराष्ट्रातील धबधबे

छायाचित्रकार : रमेश देसाई

किंमत : ₹ ७००/- । (ट.ख. ₹ ६०)

## ‘राजहंसी’ विविधा




संगमनेर येथील एक होतकरू तरुण,
स्थापत्य अभियंता. आपल्या अफाट कर्तृत्वाने
मानवी अस्तित्वाशी सगळे एकेक
कडीने जोडतो, जणू जीवन फुलवणारे...

### पाषाणाचे पाझर

स्थापत्य अभियंत्याची कर्तृत्वगाथा

विवेक गाडगीळ

किंमत : ₹ ९५०/- । (ट. ख. ₹ १००)





कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

### सीता

अभिराम भडकमकर

किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)




फ्रांझ काफ्का हा विसाव्या शतकातील महत्त्वाचा लेखक.
त्याचा जीवनपट आणि त्याचे लेखन, ‘मेटॅमॉर्फोसिस’चे
आस्वादक विश्लेषण, त्याच्याशी नाते सांगणाऱ्या
साहित्यकृतींचा परामर्श यांचा समावेश असलेले पुस्तक.

### काफ्काचं ‘मेटॅमॉर्फोसिस’

न संपणारं गारूड

डॉ. सुहास भास्कर जोशी


किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक!

## मी सखा मेघदूत : एक विलक्षण आनंदयात्रा

काही वर्षांपूर्वी एका नृत्यनाट्यासाठी मेघदूताची संहिता लिहिताना कविश्रेष्ठ कालिदासाच्या 'मेघदूतम'चा आस्वाद अनेक स्वरूपांत घेतला गेला. एका शापामुळे ताटातूट झालेल्या नवपरिणीत यक्ष-यक्षिणीची जशी ही गोष्ट आहे, तितकीच त्या यक्षाच्या मनातल्या कोमल भावना अलगद जपत त्या प्रामाणिकपणे आणि जबाबदारीनं त्याच्या पत्नीपर्यंत पोहोचवण्याची अपेक्षा ज्याच्याकडून केली गेलेली आहे अशा एका निरागस आणि निष्कपट अशा आनंदघनाची ही मूळ गोष्ट आहे.

उत्तरेकडे जाणाऱ्या त्या ढगाला थांबवून गोष्टीतला यक्ष त्याच्या अलकानगरीतल्या घराचा सगळ्या बारकाव्यांसहित पत्ता सांगून त्याच्या पत्नीला स्वत:बद्दल खुशाली कळवण्यासाठी उद्युक्त करतो इतकंच मूळ कथाबीज! अतिशय हुरहुर लावणारं..! अतृप्ती आणि तृप्ती अशा दोलायमान परिस्थितीत शेवट वाचकांवर सोपवून देणारं! पण कालिदासानं ह्यात किमया अशी केली आहे, की धूळ-धूर-वाफेच्या त्या गोळ्याला त्यानं मन आणि व्यक्तिमत्त्व बहाल केल्यामुळे मनाची रुजवण झालेल्या ह्या मेघाला सजीवपणाच्या आंतरिक संवेदनाही लाभल्या आहेत. मानवी मनाचा स्पर्श झालेल्या अशा ह्या मेघाला कालिदासाच्या नजरेतून जग कसं जाणवलं असेल? निसर्ग कसा दिसला असेल? स्वत:मधलं माणूसपण त्याला कसं जाणवलं असेल? माणसाच्या जगण्यातलंच नाही तर निर्माणातलं 'मूलद्रव्य' असलेलं प्रेम अन् त्याच्या असंख्य छटा त्याला कशा जाणवल्या असतील? प्रेमातली बांधिलकी त्याला समजली असेल का? आणि उत्तरदायित्व? ते त्याला ओझं वाटलं असेल की कर्तव्य? असंख्य भावनांच्या कल्लोळातलं मानवी जीवन त्याला अवघड वाटलं असेल की रंजक? असे अनेक प्रश्न मला पडले.




किंमत : ₹ १८०/- । (ट. ख. ₹ ५०)

वाफेच्या एका निर्जीव गोळ्याला सजीवतेबरोबर प्रेम धारण करायला,

स्वीकारायला आणि अनुभवायला मिळणं, ही अतिशय सुंदर घटना आहे असं वाटतं मला. अगदी काल्पनिक असली तरी! मूळ कथाबीजाच्या अतृप्ततेतच एक चैतन्य दडलेलं आहे. वाचकांच्या ह्या चेतना जाग्या ठेवण्यातच कालिदासाच्या मेघदूताचं यश असलं, तरी मला मात्र मेघाच्या संपूर्ण प्रवासाची उत्कंठा होती. कारण मनापासून मैत्रीला प्रतिसाद देणारा मेघ आपल्या यक्षमित्राला कार्यपूर्तीचा निरोप सांगितल्याशिवाय ही मानसयात्रा पूर्ण कशी होईल? असं मला वाटलं.

ह्या चेतनाप्रवासाचा अंतिम क्षण काय असेल ही उत्कंठा मला होती. ते समाधान मेघाला मिळायलाच हवं असं मला मनापासून वाटलं आणि हे समाधान नक्कीच त्या अतृप्तीत दडलेल्या चेतनेपेक्षा सुंदर असणार असं वाटल्यामुळे परतीचा प्रवासही पूर्ण करणाऱ्या मेघाचं मनोगत व्यक्त करण्याचा मोह मला आवरला नाही. यक्षिणीला भेटल्यावर त्या दोघांच्या विरहातही जो अद्वितीय प्रेमाचा साक्षात्कार मेघाला झाला, त्यानं भारावलेल्या मेघाला परत यक्षाला येऊन भेटण्याची ओढ इतकी अनावर असेल की त्याच्या परतीच्या प्रवासात त्याच्या सवंगड्यांना, मैत्रिणींना ओलांडून तो यक्षापर्यंत कसा पोहोचला, हे त्याचं त्यालाही कळलं नसेल. आणखी एक सुंदर गोष्ट म्हणजे यक्षाचं काम पूर्ण केल्यावर मेघानं त्या मनाचा, सजीवतेच्या क्षणांचा मोह नाही धरला. तो समृद्ध करणारा अनुभव घेऊन तो परत आपल्या स्वच्छंद अन् अमर्याद मेघविश्वाकडे निघून गेला. प्रगल्भतेचा हा आविष्कार शब्दातीत आहे. मेघदूत समजून घेताना अर्थातच हे मेघदूतत्व आपल्यात भिनल्याशिवाय राहत नाही. तो परकायाप्रवेश अनुभवणं, ही एक सुंदर अनुभूती आहे.

'मी सखा मेघदूत'चं लेखन टप्प्याटप्प्यानं करावं लागलं. पण त्यामुळेच प्रकृतीचा अंश असलेल्या मेघाचं मित्र असणं, दूत असणं हे त्याच्या कृतज्ञतेसहित मला मांडता आलं. मला खरोखरच तो नुसता विहंगम प्रवास नाही वाटला! ज्यांना मेघदूत माहीत आहे, ते मेघदूताच्या मनोगतातून मांडलेली ही मानसयात्रा नक्कीच समजून घेतील अशी खात्री होतीच; पण ज्यांना मेघदूत माहीत नाही, त्यांच्या प्रतिक्रियांचादेखील 'मी सखा मेघदूत' वाचून अक्षरश: पाऊस पडला. मेघदूताचं मनोगत अशा प्रकारे मला व्यक्त करता येईल का, अशीही एक शंका सुरुवातीला होती. पण राजहंस प्रकाशनचे संपादक डॉ. सदानंद बोरसे ह्यांनी त्या कल्पनेवर शिक्कामोर्तब केलं. मेघदूताचा पूर्ण प्रवास त्याच्या आत्मकथनातून इतका आनंद निर्माण करणारा ठरला, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. ही मानसकथा माझा हा सखा मेघदूत नक्कीच वाचकांना मूळ मेघदूतापर्यंत घेऊन जाईल, अशी मला खात्री आहे.



- ***सौ. हर्षदा पंडित***, श्रीरामपूर



# आठवणींच्या खिडकीतून

## ओक्साबोक्शी हसवणारी नाटके


केव्हातरी, कुठेतरी पाहिलेल्या अप्रतिम नाट्यप्रयोगांच्या आठवणी जशा अवचित जाग्या होतात आणि पुन्हा ताजेतवाने झाल्यासारखे वाटते, त्याचबरोबर गंभीरप्रकृतीचा नाट्यप्रयोग रंगलेला असताना अचानक झालेल्या गोंधळामुळे अवघे प्रेक्षागृह कसे ‘ओक्साबोक्शी’ हसायला लागले होते, ते आठवून आजही करमणूक होते. (माणसे ओक्साबोक्शी रडतात हे माहीत होते; पण ती ओक्साबोक्शी हसतात हे महाराष्ट्राला आचार्य अत्रे यांनी सांगितले!)

एका गावातल्या हौशी नाट्यसंस्थेने औंधकरांचे ‘आग्र्याहून सुटका’ हे नाटक करायचे ठरवले होते आणि नाटकाच्या तालमी सुरूही झाल्या होत्या. शिवाजीची भूमिका करणाऱ्या तरुण नटाने कुठूनतरी एक घोडा मिळवला आणि त्यावर बसून रपेट करण्याचा सराव त्याने सुरू केला. औरंगजेबाच्या दरबारात घोड्यावर बसून शिवाजीने ‘एन्ट्री’ घेण्यातच शिवाजीची प्रतिष्ठा असणार आहे, ही त्याची कल्पना त्याने दिग्दर्शकाच्या आणि इतर पात्रांच्या गळी उतरवली. गावात कानोकानी बातमी गेली की शिवाजी घोड्यावर बसून दरबारात येणार! नाट्यप्रयोग पाहायला तुडुंब गर्दी झाली. प्रयोग सुरू झाला. घोड्यावर स्वार झालेले शिवाजीमहाराज विंगेत तयार होते. दरबारात एन्ट्री करण्याची वेळ झाली, तेव्हा शिवाजीमहाराजांनी घोड्याला हलकेच टाच मारली आणि घोड्याने रंगमंचावर प्रवेश केला. प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. पण रंगमंचावरच्या झगझगीत प्रकाशामुळे आणि कदाचित टाळ्यांच्या कडकडाटामुळे घोडा बुजला आणि घाबरून त्याने पुढचे दोन पाय हवेत फेकले आणि मागच्या दोन खुरांवर तोल सावरत तो नाचत राहिला. घोड्यावर स्वार झालेल्या महाराजांचा तोल जाणार, असे वाटत असतानाच महाराजांनी रंगमंचाच्या वरच्या बाजूने लोंबकळणारी एक दोरी मोठे प्रसंगावधान दाखवून पकडली. प्रेक्षकांनी पुन्हा टाळ्यांचा कडकडाट केला आणि घोडा विंगेत पळून गेला. शिवाजीमहाराज असाहाय्यपणे दोरीला लोंबकळत असल्याचे पाहून औरंगजेब आसनावरून पायउतार झाला आणि आपल्या उंचीचा फायदा घेऊन त्याने महाराजांना आधार देऊन जमिनीवर उतरवले.

इतिहास काहीही सांगत असला तरी नाटकवाल्यांना पक्के ठाऊक आहे की, शिवाजीमहाराजांची सुटका औरंगजेबानेच केली!

राम गणेश गडकरी यांच्या 'संगीत भावबंधन' या नाटकामधला घनश्याम खरे तर एक सत्प्रवृत्त कारकून आहे. पण धनेश्वराच्या मुलीने - लतिकेने - चारचौघात विनाकारण त्याचा पाणउतारा केल्यामुळे तो इतका बिथरतो की कटकारस्थाने रचून लतिका, तिची मैत्रीण मालती, मालतीचे वडील धुंडिराज अशा सगळ्यांची आयुष्ये तो उद्ध्वस्त करू पाहतो. केवळ आपल्या बेताल बडबडण्यामुळे आपण सगळेच आयुष्यातून उठणार आहोत, या जाणिवेने असाहाय्य आणि अगतिक झालेली लतिका घनश्यामाकडे दयेची भीक मागते. पण सूडाने पेटलेला घनश्याम झाल्या अपमानाची लतिकेला आठवण करून देतो, तिचे वाभाडे काढतो आणि काहीही झाले तरी सूड घेण्याच्या आपल्या निश्चयापासून आपण तसूभरही मागे हटणार नसल्याचे बेमुर्वतपणे बोलून दाखवतो. —नाटकातला तो प्रवेश म्हणजे नाटकाचा उत्कर्षबिंदू !

पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिरातला 'भावबंधन'चा तो प्रयोग 'हाउसफुल्ल' होता. एकतर अलीकडे त्या नाटकाचे प्रयोग कोणी करत नव्हते; आणि 'घनश्याम' करणार होते नटवर्य चित्तरंजन कोल्हटकर. ती त्यांची हातखंडा भूमिका. प्रवेशाप्रवेशातून पुढे जातजात नाटक त्या उत्कर्षबिंदूपाशी आले. एका बाजूला हतबल झालेली लतिका आणि तिच्यासमोर नखशिखान्त खलनायक घनश्याम. गडकऱ्यांच्या लेखणीमधून उतरलेल्या वाक्बाणांनी घनश्याम लतिकेला घायाळ करत होता. प्रेक्षागृहात सन्नाटा पसरलेला. कमालीची शांतता. नर्व्हस, अस्फुट असा कोणीतरी घसा खाकरल्याचा आवाज, तेवढाच काय तो. - आणि त्या ताणलेल्या क्षणी ''मी माझ्या निश्चयापासून तसूभरही मागे हटणार नाही..'' असे घनश्याम लतिकेला पीळदारपणे बजावत असतानाच एक छानसे पांढरे आणि केशरी पट्टे असलेले गुबगुबीत मांजर विंगेतून चक्क रंगमंचावर आले आणि 'म्याँव' म्हणत दुसऱ्या विंगेच्या दिशेने गेले. त्याक्षणी प्रेक्षागृहात प्रचंड हशा उसळला. तो हशा ओसरायला वेळ लागला. पण जसेकाही काही झालेच नाही अशा आविर्भावात लतिका आणि घनश्याम, दोघेही शांतपणे


मेहमूद, किशोरकुमार, प्राण, हेलन
या सर्वार्थानं मोठ्या कलाकारांच्या
द्वारकानाथ संझगिरी यांनी खास
त्यांच्या स्टाईलनं सांगितलेल्या गोष्टी.

आम्हाला वगळा...

द्वारकानाथ संझगिरी


किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

उभे होते. काही वेळाने हशा ओसरला आणि 'घनश्याम' चित्तरंजन कोल्हटकरांनी लतिकेला बजावले, ''ऐक लतिके, मी माझ्या निश्चयापासून तसूभरही मागे हटणार नाही. - अगदी मांजर आडवं गेलं, तरीही नाही !'' - आणि प्रेक्षकांनी टाळ्यांचा जो कडकडाट केला, तो थांबेचना! - हातून सुटलेला नाट्यात्म ताण एका मुरलेल्या नटाने प्रसंगावधान राखून पुन्हा निर्माण केला होता !

नटनटी, दिग्दर्शक यांनी नाटकाच्या कितीही तालमी केल्या असल्या, तरी केव्हाकेव्हा नाट्यप्रयोगात असे काही ना काही अचानक घडत असते. ते दरवेळी हास्यकारकच असते असे नाही. कधीकधी गंभीर प्रसंगही उद्‌भवतात. प्रत्यक्ष तालमी सुरू असतानाचे किस्से असतात; नटनटींच्या एकमेकांतल्या सूक्ष्म स्पर्धेचे किस्से जसे असतात; त्याचप्रमाणे त्यांच्या प्रतिभेचे, नाटक उत्तम व्हावे म्हणून त्यांना असलेल्या असोशीचेही किस्से असतात. पाश्चात्त्य रंगभूमीवरचे असे अनेक किस्से पुस्तकरूपाने उपलब्ध आहेत. आपल्या रंगभूमीवरील नटनटी, दिग्दर्शक आणि पडद्यामागील कलाकारांना बोलते-लिहिते करून प्रकाशकांनी असे निवडक किस्से वेळोवेळी प्रकाशित केले; तर उत्तम, वाचनीय दस्तऐवज तयार होत राहतील.

ब्रिटिश रंगभूमीवरील हा एक लक्षणीय किस्सा : प्रख्यात दिग्दर्शक पीटर ब्रुक एका नाटकाचे दिग्दर्शन करीत होते. प्रमुख भूमिका करीत होते विसाव्या शतकावर आपल्या अभिनयाचा ठसा उमटविलेले ज्येष्ठ अभिनेता जॉन गिलगुड. इतर नटनटी आणि स्वत: गिलगुड आपापल्या भूमिकेचे पाठांतर करून तालमीला आले होते. नेपथ्याची मांडणी झाली होती. आता पीटर ब्रुक पात्रांच्या हालचाली बांधणार होते. गिलगुड त्यांच्या भूमिकेत रंगमंचावर आल्यावर त्यांच्या हालचाली कशा असणार आहेत, ते त्यांनी गिलगुड यांना सांगितले. गिलगुड यांनी लगेचच तशा हालचाली करून दाखविल्या. गिलगुड यांच्या हालचालींच्या अनुषंगाने पीटर ब्रुक यांनी इतर पात्रांच्या हालचाली बसविल्या. - पहिला प्रवेश पाहतापाहता बसल्याच्या


स्तानिस्लावस्की हा जगभराच्या रांगकर्मींसाठी अत्यंत आदरणीय दिग्दर्शक. रंगमंचावरचा सहजसुलभ वापर, प्रभावी शब्दफेक, अर्थपूर्ण विराम यांविषयीचे त्याचे विचार आजही मौलिक समजले जातात.



**रंगमंचकला**

मूळ रशियन लेखक : कनस्तंतीन स्तानिस्लावस्की

इंग्रजी अनु. : डेव्हिड मॅगरशॅक । मराठी अनु. : ओंकार पटवर्धन

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

आनंदात सगळे त्या रात्री घरी गेले. दुसऱ्या दिवशी सगळे पुन्हा जमले, तेव्हा पीटर ब्रुक पुढचा प्रवेश बसविण्याच्या तयारीत होते. पण गिलगुड यांनी पीटर ब्रुक यांना हलकेच जरा बाजूला नेले आणि म्हणाले, ''पीटर, काल तू बसवलेल्या हालचालींचा मी घरी गेल्यावर विचार केला आणि मला वाटलं की हालचाली जरा वेगळ्या असायला पाहिजेत.'' - गिलगुड यांनी सुचविलेल्या हालचाली पीटर ब्रुक यांना ठीक वाटल्या आणि त्यांनी इतर पात्रांच्या हालचालीही बदलल्या. तिसऱ्या दिवशी सगळे जमले, तेव्हा गिलगुड यांनी अगदी वेगळ्याच हालचाली सुचविल्या. त्याही पीटर ब्रुक यांना आवडल्या आणि पुन्हा इतर पात्रांच्या हालचाली त्यांनी नव्याने बसवल्या. चौथ्या दिवशी आधीच्या सगळ्या हालचाली रद्द करून गिलगुड नव्याच हालचाली सुचवू लागले, तेव्हा त्यांना जरा बाजूला नेऊन पीटर ब्रुक त्यांना म्हणाले, ''जॉन, तू सुचवलेल्या सगळ्या हालचाली अप्रतिम, नाटकाच्या आशयाला अगदी योग्यच आहेत याबद्दल शंकाच नाही. पण असं बघ की, आपल्याला इतर प्रवेशही बसवायचे आहेत. तेव्हा कोणत्यातरी हालचाली निवडून त्या एकदाच्या पक्क्या करायला पाहिजेत. तुला काय वाटतं?'' - गिलगुड जरासे बावचळले. स्वत:ला सावरून म्हणाले, ''सॉरी पीटर, हे माझ्या लक्षातच आलं नाही. तू म्हणतोस, ते बरोबर आहे. हालचाली एकदाच्या पक्क्या केल्याच पाहिजेत. - तर मग मला काल सुचलेल्या हालचाली आज करून पाहू या का?'' —पीटर ब्रुक यांना हसू आवरेना...

अत्यंत अस्थिर मनाचा, सतत अस्वस्थ असणारा हा प्रतिभाशाली अभिनेता कोणतीही भूमिका करत असूदे, रंगमंचावर नेहमीच सिल्कचा एक भलामोठा रुमाल जवळ बाळगत असे आणि त्याचा चपखल उपयोगही करीत असे.

***माधव वझे***
९६०४८४८०३३



साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे,
तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले
प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी
अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला
पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

# क...
# कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## द्वैताची निवृत्ती

द्या हो देवा, नामाची ओंजळ
ज्यात भरली सुमने प्रांजळ
वाहुनी ती श्रीरामा चरणी केवळ,
सदा घडो नाम पूजा, सर्वदा.

द्या हो देवा, शरणागतीचा भाव
कायम राहो गुरुप्रेमाचा प्रभाव
महाराज तुम्ही आत्मस्वरूपी राव
सदा अंतरंगी वास तुमचा

द्या हो देवा, द्वैताची निवृत्ती
सर्वव्यापी श्रीरामाची घडो आवृत्ती
सदा रामनामाची व्हावी प्राप्ती
हेच मागणे वारंवार

द्या हो देवा, संतांचा मेळा
सदा होतो नामाचा सोहळा
जिथे लागावा भगवत्प्रेमाचा लळा
सदा संगत सज्जनी असो.

***ऋतुराज वैद्य***
८८८८०३८१४९

## 'राजहंसी' विविधा



'साहित्य अकादमी युवा पुरस्कार' विजेता काव्यसंग्रह!
समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि
सांस्कृतिक अंगाला भिडणाऱ्या
निरनिराळ्या अवस्थांच्या कविता!

### मी संदर्भ पोखरतोय

पवन नालट

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)


एकाच कवीने तीन वेगवेगळ्या काळांच्या पटावर नजर ठेवून
आयुष्याचे जे तत्त्वज्ञान तयार केले आहे, ते जगण्याचा हिशेबच.
हा कवितासंग्रह म्हणजे कवीच्या जगण्याचा
वैचारिक लेखाजोखा!

### आतून उगवलेल्या कविता

प्रा. प्र. द. कुलकर्णी

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)





रंगीबेरंगी वातावरणात रंगलेले शैशव. नंतर रानावनात
हिंडण्याची, निसर्गात रमण्याची नितांत आवड. कुंवार जंगलाचे
अननुभूत सुख आणि अरण्यवासी आदिवासींचे निसर्गजीवन
जवळून पाहताना मनावर पडलेली रानाची मोहिनी.
यातून उमललेल्या कवितांच्या भावफुलांमधून
श्वासाश्वासात सामावलेला काव्यगंध.

### रानगंध

मीनल प्रधान

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

## ऐसपैस गप्पा नीलमताईंशी

*‘ऐसपैस गप्पा’ या गप्पाच राहतील, त्याचा ‘गौरवग्रंथ’ होणार नाही, अशी भूमिका लेखिकेने मनोगतात व्यक्त केली आहे, जी कसोशीने जपली आहे. त्यामुळे स्त्रीवादी नेतृत्वाच्या जडणघडणीतील गत चार दशकांचे दुवे तपासून बघण्यासाठी हे पुस्तक एक महत्त्वाचा दस्तावेज ठरणार आहे.*

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याशी मनमोकळ्या गप्पांच्या माध्यमातून संवाद साधत लेखिका करुणा गोखले यांनी महाराष्ट्रातील स्त्री चळवळ, महिलांचा राजकीय सहभाग, दलित आणि दलितेतर चळवळ, विविध राजकीय पक्ष आणि स्त्री नेतृत्वाला त्यात मिळणारी वा नाकारली जाणारी संधी, राजकारण्यांमधील साहित्यसर्जन, फेमिनिस्ट फॉरेन पॉलिसी असा विस्तृत पट उभा केला आहे. ‘ऐसपैस गप्पा’ या गप्पाच राहतील, त्याचा ‘गौरवग्रंथ’ होणार नाही, अशी भूमिका लेखिकेने मनोगतात व्यक्त केली आहे, जी कसोशीने जपली आहे. त्यामुळे उपरोक्त विषयांसंदर्भातील गत चार दशकांचे दुवे तपासून बघण्यासाठी हे पुस्तक एक महत्त्वाचा दस्तावेज ठरणार आहे.

अभ्यासात हुशार परंतु लहानपणीच सामाजिक भान प्राप्त झालेली वडलांची लाडकी कन्या, वरळीतील वास्तव्य आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलन-आचार्य अत्रेंच्या ‘मराठा’तील अग्रलेखांचा प्रभाव, पोद्दार महाविद्यालयातून डॉक्टर होत वैद्यकीय व्यवसाय, संवेदनशील लेखिका आणि कवयित्री, पुढे ‘युक्रांद’मधील धडाडीचा सहभाग, विंदांच्या स्नुषा आणि लेखनाला त्यांची मिळणारी शाबासकी, क्रांतिकारी महिला संघटनेची उभारणी, डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या भारतीय रिपब्लिकन पक्षाची निवड, सरचिटणीसपदाची जबाबदारी, भारिपचा राजीनामा, स्त्री आधार केंद्र, आंतरराष्ट्रीय महिला हक्क परिषदांमधील सहभाग, शिवसेनेच्या माध्यमातून चार वेळा विधानपरिषद सदस्यत्व, दोन वेळा उपसभापती, अलीकडच्या नव्या राजकीय समीकरणात नवी भूमिका या प्रवासात गोखले यांनी वाचकांनाही सहभागी करून घेतले आहे. राजकीय मंचावर नीलमताईंचे ‘डावी’कडून ‘उजवी’कडे झालेले

स्थित्यंतर आणि त्याच वेळी नास्तिकतेकडून आस्तिकतेकडेही झालेला प्रवास गप्पांच्या ओघात कळतो.

विसंवादाचे सूरच अनेकदा उमटत राहिले; पण कोरसचे रूपांतर कोलाहलात होणार नाही, याची काळजी नीलमताईंनी घेत स्वत:तील स्वयंप्रेरित कार्यकर्तेपण कसे कायम ठेवले, त्याचाही हे पुस्तक म्हणजे लेखाजोखा आहे. या गप्पांमधून पुढे येणाऱ्या अनेकविध आठवणी महाराष्ट्रातील समकालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या आहेत. चिंतनशील आणि चिकित्सक स्वभावाला वाचनाची जोड मिळाल्याने एक संस्कारी स्त्री-नेतृत्व कसे आकाराला येत गेले, त्याचे मनोज्ञ दर्शन या पुस्तकात घडते.

गोखले आणि गोऱ्हेंमधील या गप्पांमधून समाजकारणाच्या दृष्टीने काही महत्त्वाची निरीक्षणे आणि नोंदी पुढे येतात. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात समाजकारण आणि राजकारण यांत योगदान देण्यासाठी अनेक उच्चशिक्षित तरुण-तरुणी फुलटाइमर म्हणून पुढे आल्या. विवाह झाल्यावर पुरुषाने समाजकारण-राजकारणाची आघाडी सांभाळायची आणि स्त्रीने नोकरी पत्करून कुटुंबाची आघाडीही सांभाळायची. यामुळे अनेक स्त्रिया नेतृत्वक्षमता असूनही पुन्हा त्याच चौकटीत जखडल्या गेल्या, अशी खंत नीलमताई व्यक्त करतात. दलित चळवळ, दलित समाज आणि दलित नेतृत्व यासंदर्भात त्या म्हणतात, 'राजकीयदृष्ट्या दलित समाज नेहमीच कोंडीत सापडलेला होता. त्याच्यापुढे संभ्रम असा होता की, आपण मेन स्ट्रीम पक्षाचे कार्यकर्ते होऊन, यथावकाश त्याचं नेतृत्व काबीज करून स्वत:च्या समाजाचे प्रश्न सोडवायचे की प्रामुख्यानं दलित समाजासाठी कार्य करणाऱ्या संघटनांद्वारे राजकारण करून, सत्ताबदल होईल अशी आशा धरून स्वत:ला डेडिकेट करायचं? अशा संघटनांचं काम करत करत बाबासाहेबांनी सांगितल्यानुसार शासनकर्ती जमात व्हायचं का? नक्की कोणता मार्ग पकडायचा? त्यामुळे विचारवंत कधीकधी सर्व संघटना एकाच तराजूत तोलतात, ते बरोबर नाही.'

स्त्री हक्कांसाठी नेहमीच लढाऊ पवित्र्यात असलेल्या नीलमताई स्वभावाने तितक्याच मिश्कील आहेत. पोद्दार वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना रटाळ विषय शिकविणाऱ्या प्राध्यापिकांच्या वर्गाला दांडी मारण्यात 'नेतागिरी'ची जबाबदारीही पार पाडत, मात्र एकदा त्या कशा पकडल्या गेल्या, हा आणि असे किस्सेही आपल्याला वाचायला मिळतात. महिलांवरील विनोदाला आपण दाद द्यायची नाही, असा निग्रह व्यक्त करणाऱ्या नीलमताई सतत वैचारिक वाचनाचा कंटाळा आल्याने रुचिपालट म्हणून एका प्रवासात सुनीताबाईंना 'उपदेशपांडे' म्हणणाऱ्या 'पुलं'चे 'तुम्हाला कोण व्हायचंय...पुणेकर, मुंबईकर की नागपूरकर...?' ऐकून प्रफुल्लित झाल्याचे सांगतात.

नीलमताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजवाद्यांचे व्यवच्छेदक लक्षण असलेल्या चर्चा आणि वितंडवादाच्या गुंतवळ्यात फारसे न अडकता कृतिशील तेला त्यांनी सतत दिलेले प्राधान्य हे होय. बाबासाहेबांच्या समग्र लेखनातील चिंतनशीलता आणि भगवद्गीतेतील कर्मयोग यांचा आपल्यावर प्रभाव असल्याचे त्या सांगतात. मार्क्सप्रणित रशियन राज्यक्रांतीच्या अगोदरचे समाजवादी समाजरचनेचे आद्य आविष्करण म्हणजे 'पॅरिस कम्युन'. राशीन येथील कम्युनमध्ये नीलमताईंनी वास्तव्य केले होते. दहा किलोमीटर पायपीट करीत 'रोहयो'च्या कामांना भेटी दिल्या. अनुभवाला थेट भिडणारा, अत्याचाराची घटना जेथे घडली असेल तेथे प्रत्यक्ष जाऊन धडकण्याचा त्यांचा स्वभाव आणि त्यानुषंगिक निवेदन नव्या पिढीतील सर्वक्षेत्रीय कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आहे. राशीन ते राजभवनातील या पुस्तकाचे प्रकाशन हा संदर्भपट फार मोठा परंतु आपल्या संसदीय लोकशाहीच्या वाटचालीच्या दृष्टीने तितकाच आश्वासक आहे. गप्पांचा पट विस्तृत असला, तरी त्याचा केंद्रबिंदू अर्थातच स्त्रीवादी नेतृत्वाची स्त्रीवादी भूमिका हाच राहिला असल्याने गोदूताई परुळेकर, मृणाल ताई गोरे, अहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी, प्रमिला दंडवते या तत्कालीन रणरागिणींचाही परामर्ष गप्पांच्या ओघात येणे, उचित ठरले असते.

पुस्तकातील विभाजकांसाठी निवडण्यात आलेले विषय आणि छायाचित्रे यांची आकर्षक मांडणी यामुळे ते नुसते चाळायला म्हणून हाती घेतले, तरी निम्मेअधिक वाचून होते. कोणतेही पान उलगडून आपण या दोघींमधील गप्पांचा वाचनानंद घेऊ शकतो.

***नीलेश मदाने***


(*महाराष्ट्र टाइम्स,* संवाद पुरवणी, १४ एप्रिल २०२४मधून साभार)


राजकारण आणि समाजकारण या दोन तलवारी एकाच म्यानात राहत नाहीत, हे वचन खोटं ठरवणाऱ्या कार्यकर्त्या. स्थानिक प्रश्नांवर काम करताना वैश्विक घडामोडींचं भान ठेवून उत्तरं शोधणाऱ्या नेत्या.

ऐसपैस गप्पा नीलमताईंशी

करुणा गोखले

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३६०/- । (ट.ख. ₹ ५०)



## 'राजहंसी' विविधा




श्री. पु. भागवतांच्या नेतृत्वाखाली 'मौज' साप्ताहिक, 'सत्यकथा' मासिक आणि 'मौज प्रकाशनगृह' यांनी वाङ्मय आणि कला या क्षेत्रांत केलेल्या कार्याचे व श्री.पुं.नी या तिन्ही विभागांत केलेल्या संपादनाचे स्वरूप वस्तुनिष्ठ भूमिकेतून तपासण्याचा प्रांजळ प्रयत्न.

### वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत

संपादक : सुधीर रसाळ, वसंत पाटणकर

किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ ६०)

नोकरी मागणारा नव्हे, तर अनेकांना नोकरी देणारा तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या हणमंतराव गायकवाडांची अन् 'भारत विकास ग्रुप'ची कहाणी!

### असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)






ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने आणि साध्य काहीही असो, आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

### आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## विवाह नाकारताना : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून : शिरीष शेवाळकर, शिरीष सहस्रबुद्धे, आरती घारे, विनया खडपेकर, दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे

## माझा लढा : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून : तृप्ती देशपांडे, प्रशांत दीक्षित, दिलीप माजगावकर, नागराज बोरसे, डॉ. सदानंद बोरसे

# ‘दैनंदिन पर्यावरण’ : आनंद आणि शल्य

*‘राजहंस’ने दिलीप कुलकर्णी ह्यांची १८ पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांपैकी बहुतेक सर्व ही पर्यावरण, विकास, निसर्गस्नेही जीवनशैली अशा विषयांवरची आहेत. त्यांचे सर्वांत लोकप्रिय पुस्तक ‘दैनंदिन पर्यावरण’. नुकतीच त्याची २०वी आवृत्ती प्रकाशित झाली. ५ जूनच्या ‘जागतिक पर्यावरण दिना’च्या निमित्ताने ह्या पुस्तकाविषयीचे त्यांचे हे सिंहावलोकन.*

सुमारे तीन महिन्यांपूर्वी ‘दैनंदिन पर्यावरणा’ची विसावी आवृत्ती हाती आली, आणि ती बघताना गेल्या तीस वर्षांचा कालखंड माझ्यापुढे उभा राहिला.

‘दैनंदिन पर्यावरण’ हे माझं सर्वांत लोकप्रिय पुस्तक. ‘२० आवृत्त्या’ ही बाबच ते आपसूकपणे सांगून जाते. पण, आवृत्त्यांची ही संख्या ही लोकप्रियतेविषयी अर्धीच माहिती देते. ‘आवृत्ती’ ही साधारणपणे १००० प्रतींची मानली जाते; तथापि, ‘दैनंदिन पर्यावरणा’च्या अनेक आवृत्त्या ह्या २०००, वा क्वचित ३००० प्रतींच्याही निघालेल्या आहेत. त्यामुळे, एकूण प्रतींची संख्या २०,००० हून बरीच अधिक आहे.

एखादं पुस्तक लोकप्रिय होण्यात अनेक घटकांचा सहभाग असतो. ‘दैनंदिन’च्या बाबतीत त्या साऱ्याच बाबी छानपैकी जुळून आल्या : विषय, शैली, मांडणी, सजावट, मुखपृष्ठ... सर्वच काही.

१९८६मध्ये ‘राजहंस’नं ‘निसर्गायण’ हे माझं ‘पर्यावरणा’वरचं पहिलं पुस्तक प्रकाशित केलं. (ते ‘वैचारिक’, ‘जड’ वगैरे असल्यानं लोकप्रिय व्हायची जराही शक्यता नव्हती. तरीही आजवर त्याच्या १३ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत, हे इथे आवर्जून सांगावंसं वाटतं.) ह्या पुस्तकात, पर्यावरणाच्या समस्या सुटण्यासाठी जो मूलभूत वैचारिक बदल आवश्यक आहे, त्याची तात्त्विक चर्चा आहे. तथापि, ‘म्हणजे मग आम्ही प्रत्यक्षात काय करायचं’ ह्या प्रश्नाला त्यातून उत्तर मिळत नाही. वाचकांची ही अडचण खरीच होती, आणि त्यामुळे ‘Practical Guide’ ह्या स्वरूपाचं एखादं पुस्तक लिहायला हवं, हे मलाही जाणवत होतं. दुसरं म्हणजे, काही जण ‘निसर्गायण’ कधीच हातात धरणार नव्हते. अशांसाठी थोडं रंजक ‘लोकप्रिय’ स्वरूपाचं पुस्तक उपयुक्त ठरणार होतं. ते वाचून असे लोक नंतर ‘निसर्गायणा’कडे वळतील, अशी (भाबडी) आशा मला वाटत होती. ह्यातूनच ‘Dos and Don'ts’ किंवा ‘tips’ सांगणाऱ्या पुस्तकाचा विषय मनात घोळत होता.


तरीही, अशा पुस्तकाचं प्रत्यक्ष लेखन मात्र मागेच राहत होतं. दरम्यान, १९९३मध्ये आम्ही पुणं सोडून कोकणात येऊन स्थायिक झालो. ह्या मोठ्या स्थित्यंतराच्या काळातली मानसिकता हीदेखील पुस्तकलेखनाला अनुकूल नव्हती. इकडे आल्यावर, जरा बस्तान बसल्यावर मात्र लिखाणाचं मनावर घेतलं. पण,

पहिलं लेखन झालं, ते ‘पर्यावरण’ हा विषय मुलांना समजावून देणाऱ्या ‘हसरे पर्यावरण’ ह्या पुस्तकाचं. ते प्रकाशित झालं जून १९९४मध्ये. त्याचं लेखन पुरं होऊन ते प्रकाशनार्थ ‘राजहंस’कडे गेल्यागेल्याच मी ‘दैनंदिन’च्या मागे लागलो.

ह्या पुस्तकाचं लेखन हा माझ्यासाठी खूपच ‘सोपा पेपर’ होता. पर्यावरणाच्या हितासाठी ‘हे करा - हे टाळा’ अशा प्रकारचे व्यावहारिक उपाय मी व्याख्यानांमधून सांगत होतोच. त्याव्यतिरिक्त पुण्याच्या ‘परिसर’ ह्या संस्थेत प्रकाशित केलेलं ‘पर्यावरण-दक्षता-सूची’ हे भित्तिपत्रक, आणि ऑस्ट्रेलियातल्या ‘Earth Repair Foundation’नं प्रकाशित केलेलं ‘100 Things That you can Do’ ह्यांतूनही काही कृती मला कळाल्या. ह्या साऱ्यातून, भारतीय किंवा महाराष्ट्रीय - संदर्भात लागू असणाऱ्या १०१ कृति-कणिकांची यादी मी तयार केली. मग, त्यांचे काही गट होऊ शकतात हे लक्षात आल्यावर ‘घरात’, ‘कार्यालयात’, ‘शाळेत’, ‘रस्त्यावर’ अशा गटांत त्यांची विभागणी केली. पण, ‘घरात’ करण्याच्या कृतींची संख्याच ५६ झाली. म्हणून मग त्यांचे ‘घरात’, ‘स्वयंपाकघरात’, ‘न्हाणीघरात’, ‘परसात’ असे ४ गट केले. त्याशिवाय आणखी ८ गट झाले आणि ह्यांपैकी कोणत्याच गटात न बसणाऱ्या ‘विधायक उपक्रमां’चा शेवटचा वेगळा गट झाला.

ह्या १०१ कृति-कणिका वाचकांसमोर ठेवताना मला त्या पुन्हा ‘विचार-बंबाळ’ करायच्या नव्हत्या. विचार निश्‍चितपणे मांडायचा होता. पण, तो होमिओपॅथीच्या गोड गोळीबरोबर सूक्ष्म औषधही पोटात जावं, तसा. त्यामुळे, ‘गोळी गिळली जाणं’ हे महत्त्वाचं होतं. त्यासाठी लेखनशैली ही खुसखुशीत, चुरचुरीत, चटपटीत, रंजक अशी असणं आवश्यक होतं. विनोद (जे माझ्या ‘गंभीर’ लिखाणात सहसा नसतातच), जाता जाता काढलेले चिमटे (जे माझ्या लिखाणात भरपूर असतात) हे आवश्यक होते. ते लिखाणाला एक वेगळी खुमारी तर


माणसाच्या अतिरेकी उपयोगामुळे पर्यावरणाच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. ह्या समस्या सुटायच्या, तर आपलं वागणं आपण बदलायलाच हवं. दैनंदिन जीवनात करण्या/टाळण्याच्या अशा १०१ गोष्टींविषयी सांगणारं हे पुस्तक.




**दैनंदिन पर्यावरण**

दिलीप कुलकर्णी

आवृत्ती विसावी । किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

आणतातच; शिवाय (जाता जाता) आणखीही बरंच काही साध्य करतात. अशा प्रकारे लिखाण करण्याची माझ्यासाठी ही एकमेव संधी होती.

डोक्यात हे सर्व शिजल्यावर पुढचा भाग फारच सोपा होता. ए-४ आकाराचे ५१ कागद (अर्थातच पाठकोरे) निम्मे फाडले, आणि त्यांवर १०१ कणिका झपाझप लिहून काढल्या. (१ कागद शिल्लक राहिला.) अवघ्या पंधरा दिवसांत लेखन पुरं झालं. मला 'पुनर्लेखन' कधीच करावं लागत नाही. किरकोळ 'काकपदां'वर काम होऊन जातं.

त्यामुळे लेखन पुरं होताचं मुद्रणासाठी ते 'राजहंस'कडे लगेच गेलंही. पण, हस्तलिखित पुण्याला पाठवल्यावर असं वाटलं की, 'नाही; नुसतंच 'काय करा-काय टाळा' हे सांगणं अपुरं आहे. असं 'का करायचं' हे, थोडक्यात का असेना, पण सांगणं आवश्यक आहे. (ही जित्याची खोड!) म्हणून मग 'पर्यावरण : समस्या आणि उपाय' हे 'पूर्वपीठिका'पर प्रकरण लिहिलं.

ह्या पुस्तकाची अनुक्रमणिकाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. तीत १ ते १०१ अशी कृति-कणिकांची नुसती क्रमश: सूची नसून, प्रत्येक कृतीपुढे 'ध्येयनिश्चिती' आणि 'ध्येयपूर्ती' असे दोन चौकोन आहेत. ह्या केवळ 'विचार-कणिका' नसून 'कृति-कणिका' आहेत, हे मनावर ठसण्यासाठी ही चित्राकृती (graphic) उपयोगी ठरते. शिवाय, स्वयं-मूल्यमापन करण्यासाठीही तिचा उपयोग होतो. 'ध्येयपूर्ती'च्या जितक्या अधिक चौकोनांत '✓' च्या खुणा असतील, तितकी आपली जीवनशैली अधिक निसर्गस्नेही.

पुस्तक दिलीपरावांना एकदमच आवडलं. 'कॉपी' हातात आली की, त्यांच्यातला 'प्रकाशक' कार्यरत होतो, नि मांडणी-सजावट-मुखपृष्ठ ह्यांबाबत ते काही एक निश्चिती करतात. मग पुस्तक लेखकाइतकंच 'राजहंस'चंही बनून जातं. 'दैनंदिन'च्या सजावटीसाठी त्यांनी मुंबईच्या अनिल दाभाडे ह्यांची निवड केली. मुद्रितं जेव्हा माझ्या हातात आली, तेव्हा ती बघून मी तर हरखूनच गेलो! एका पानावर एक कृति-कणिका आणि खाली चौकोनात तिला अनुरूप असं रेखाटन! अतिशय आकर्षक अशी ही पृष्ठरचना होती. मात्र, त्यामुळे पानांवरचा खालचा पाव - अर्धा भाग कोरा राहत होता. मांडणीच्या शैलीमुळे ह्याला पर्याय नव्हता, हे खरंच; पण ही कोरी जागा मला अजूनही डाचत राहते. 'कागद वाया जात असल्याचा' अपराधीभाव मनात निर्माण करत राहते. असो; 'प्रकाशकेच्छा बलीयसी'! (मी अशा बाबतीत थोडी कुरकुर करतो; पण, दिलीपराव ती मनावर घेत नाहीत.)

आतल्याच रेखाचित्रांच्या रंगीत प्रतिमा वापरून दाभाड्यांनी मुखपृष्ठही फार सुरेख केलंय. दिनदर्शिकेच्या पानासारखी रचना, प्रसन्न गुलाबी रंगच्छटा ह्यांमुळे ते खूपच आकर्षक बनलंय. 'पर्यावरण' म्हटलं की 'हिरवा रंग' ह्या रूढ संकल्पनेला


छेद देणारं असूनही हे मुखपृष्ठ छान वाटतं. माझ्या अन्य काही पुस्तकांची मुखपृष्ठं नंतर बदलली गेली; पण ‘दैनंदिन’च्या बाबतीत कोणताही बदल मुळीच संभवत नाही. एखादं पुस्तक ‘जमून जातं’ म्हणतात, तसं ह्याचं झालं आहे.

हे पुस्तक लोकप्रिय होणार होतंच, झालंही. आपण आपला अभिप्राय कळवला तर लेखकाच्या अंगावर मूठभर मांस चढून त्याची स्थूलता वाढेल, ह्या भीतीपोटी वाचकांनी संख्येच्या प्रमाणात अभिप्राय कळवले नाहीत, हा भाग वेगळा! एका वाचकानं मात्र निनावी पत्र लिहून ‘तुम्ही मूर्ख आहात; हे पुस्तक वाचून तुमची मुलं-सुना-नातवंडं तुम्हाला शिव्या घालणार आहेत,’ अशी खरमरीत प्रतिक्रिया आवर्जून कळवली. तसं काही झालं नाही, हा भाग वेगळा.

व्यक्तींप्रमाणेच शाळांनीही ह्या पुस्तकाचा खूप उपयोग करून घेतला. सकाळी ‘उपक्रमा’च्या वेळी ह्यातली एक-एक कणिका रोज मुलांना वाचून दाखवणं; काही कणिकांची भित्तिपत्रकं बनवणं, त्यांची प्रदर्शनं भरवणं असे उपक्रम शाळांमध्ये झाले.

समाज-माध्यमांचा वापर वाढल्यावर मात्र अशा प्रकारच्या विचार-प्रसाराला एक वेगळंच वळण लागलं : काहींनी चक्क पुस्तकाच्या पानांचे फोटो काढून ते आपापल्या गटांत प्रसारित करायला सुरुवात केली. हे लेखक/प्रकाशकावर अन्याय करणारं तर होतंच; पण मुळात बेकायदेशीरही होतं. त्यामुळे, जेव्हा जेव्हा असे प्रकार उघडकीला आले, तेव्हा तेव्हा संबंधितांना स्पष्ट शब्दात तसं न करण्याची ताकीद द्यावी लागली. त्यावर काही महाभागांनी ‘आम्ही तुमच्याच विचारांचा प्रसार करतोय नं’ असं मला सुनावलं. तेव्हा मात्र ‘कॉपीराइट कायद्याचा भंग’, ‘पोलिसात तक्रार’ अशा पद्धतीनं बोलून त्यांना वठणीवर आणावं लागलं. एखादं


शहरातला झगमगाट, सुखसोई अन् त्रासही त्यांनी नाकारला. जगण्याचा वेग अन् गुंतागुंत कमी करण्याचा प्रयत्न केला. त्या वेगळ्या वाटेवरच्या माणसांचा परिचय करून देणारं अफलातून पुस्तक.




हरित साधक

संपादक : डॉ. सदानंद बोरसे

समन्वयक : दिलीप कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ १३०/- । (ट.ख. ₹ ५०)

पुस्तक ‘भयंकर’ आवडलं, तर त्याचं छोटंसं परीक्षण लिहून ते सर्वांना सांगणं ही योग्य पद्धत. लेखकाचं मानधन बुडवून, त्याची बौद्धिक संपदा परस्पर सर्वांना वाटणाऱ्या ह्या फुकट्यांचं काय करायचं? येत्या काळात ही ‘पायरसी’ची समस्या वाढणारच आहे, असं वाटतं.

ह्या पुस्तकाच्या गुजराती भाषांतराच्या बाबतीतही हाच प्रकार झाला. अहमदाबादेतल्या एका संस्थेने मला काहीही न सांगता-विचारता ते परस्पर प्रकाशितही करून टाकलं! आतली चित्रं, मुखपृष्ठ सर्व काही तेच; फक्त गुजरातीत. मला हे कळल्यावर ‘राजहंस’करवी नोटीस पाठवून त्यांचा गुन्हा लक्षात आणून दिला; माफी मागायला लावली; आणि माझ्या व ‘राजहंस’च्या रॉयल्टीची रक्कम चेकनं पाठवायला सांगितलं. लेखकाचं मानधन बुडवण्याची अशी प्रवृत्ती सार्वत्रिक का असावी!

येत्या १५ ऑगस्टला तीस वर्षं होतील हे पुस्तक प्रकाशित होऊन. ह्या सर्व काळात लोकांच्या, वाचकांच्या जीवनशैलीत खूप मोठा बदल नाही झालेला; पण अनेकांनी छोटे छोटे बदल मात्र निश्चित केले. तथापि, हे सारं ‘Too little, too late’ असंच आहे का, असं मनाला सतत वाटत राहतं.

हे पुस्तक इतरांना भेट दिलं जाण्याचं प्रमाण खूप आहे. संक्रांत, अधिक महिन्याचं वाण, वाढदिवस, लग्न.... अशा निमित्तांनी ह्या पुस्तकाच्या प्रती लुटल्या-वाटल्या गेल्या. विषयाच्या प्रसारासाठी हे चांगलंच आहे. पण, त्यातून हे केवळ ‘भेट देण्याचं’ पुस्तक बनलंय का? ‘फॉरवर्डिंग’ खूप होतंय : ‘इनवर्डिंग’चं काय? पुस्तकाच्या आवृत्त्यांमागून आवृत्त्या निघताहेत; पण पर्यावरण मात्र सातत्यानं खंगतच चाललंय. त्यामुळे, पुस्तक ‘लोकप्रिय’ आणि ‘खपाऊ’ असतानाही, माझ्या मनाला आनंद होण्यापेक्षा, हे शल्यच अधिक डाचत राहतं.

***दिलीप कुलकर्णी***, ८६९८१९५०७६




बेसुमार वृक्षतोड, बेफाम खाणकाम. अनिर्बंध बांधकाम आणि अविचारी पाडकाम. मानवाने निसर्गाची हत्या चालवली आहे. पण निसर्गाची हत्या म्हणजे माणसाची आत्महत्या. कशी, ते सांगत आहे...

मानवी अविवेकाचे अंतरंग
निसर्गकल्लोळ

अतुल देऊळगावकर

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## लपलेलं लंडन

आदरणीय अरविंद रे यांस,

मी पुण्याहून एक वाचक या नात्याने हे लिहीत आहे.

आपल्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले 'लपलेलं लंडन' हे पुस्तक वाचून झाले. कादंबरी अतिशय सुरेख जमली आहे.

आपले आडनाव वाचून कादंबरी अनुवादित आहे की काय, अशी शंका आली. पण तसे काही नाही.

मुकुंद दीक्षित हा नायक लंडनमध्ये एका खासगी संस्थेत इंग्रजी शिकवायला लागतो व त्याच्यापुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रूपाने स्थलांतरित लोकांचे वेगळेच जग म्हणजेच 'लपलेलं लंडन' उलगडत जाते. तुम्ही स्वत: इंग्लंडमध्ये इंग्रजी शिकवायचा. त्यामुळे पुर्वायुष्यातील अनुभवांचे प्रतिबिंब या कादंबरीत पडले आहे, असे वाटते.

कादंबरी तीन भागांत विभागली आहे. पहिला भाग म्हणजे लेखक लुब्लिन येथे टीचर्स ट्रेनिंग शिबिर घ्यायला जातो अन् तिथे व्यवसायवृद्धी होईल का याची चाचपणी करतो. दुसऱ्या भागात लंडनमधील इंग्रजी अध्यापनाची एक बॅच व त्यातील अनुभव, तिसऱ्या भागात अजून एक बॅच व त्यातील अनुभव. यातील पहिला भाग अर्धवट सोडलेला वा वाचकाच्या कल्पनाशक्तीवर सोपवलेला वाटला. त्याचा व उर्वरित भागांचा कालानुक्रम नीट कळला नाही, तरी त्याने फार काही बिघडत नाही.

पण समोरच्या बॅचमधील प्रत्येक विद्यार्थ्याची पार्श्वभूमी, घरच्यांच्या अपेक्षांचे ओझे, बरेचदा इमिग्रेशन एजंटला पैसे देणे वगैरे अनधिकृत मार्गाने 'काहीही करून लंडन गाठायचे' असे ठरवून आल्याने कामाच्या ठिकाणी होणारे शोषण, मुख्य म्हणजे इंग्रजी न येणे, त्यामुळे येणारा न्यूनगंड या साऱ्या गोष्टी उलगडत जातात. टीव्ही

सिरीयल पाहत जावी व त्या पात्रांमध्ये गुंतायला व्हावे, तसे ही कादंबरी वाचताना होते. एक खास मुद्दा असा की, यातील स्थलांतरित विद्यार्थ्यांमध्ये बहुतांश शीख दाखवले आहेत. प्रत्यक्षात तसेच असेल असे वाटते. तसेच काहीही करून पंजाबातील गावात महाल उभारायचाच, ही मानसिकता खास तिकडली पंजाबी NRIची वाटते.


मुकुंद दीक्षित या नायकामध्ये शिक्षकाबरोबर एक सहृदय फ्रेंड फिलॉसॉफर व गाईड दडलेला आहे. प्रेमळ पती व बाप दडलेला आहे. त्याची पत्नी व मुलगी त्याच्या विद्यार्थ्यांच्या सुखदु:खात सहभागी होतात. NRI वा परदेशात नागरिक झाल्यावर किती जण मुलांना मराठी उत्तम शिकवतात? इथे नायकाची मुलगी मराठी वाक्प्रचार, म्हणी वापरतेच; पण त्यातून विनोदनिर्मितीदेखील करते. तसेच भाषिक विनोद इंग्रजी शिकवण्यातपण येतात व आपल्याला हसवत राहतात.

हे वाचून सारी कादंबरी ‘फिल गुड’ घटनांनी भरली आहे असे वाटले होते, पण तसे नाही. अतिशय धक्कादायक घटनासुद्धा घडत जातात. मनमीतचा मृत्यू चटका लावून गेला.

खास आवडलेला भाग म्हणजे जाताजाता आपल्याला जे शिकायला मिळते, तो वाटला. त्या त्या वेळी गुगल सर्च करत होतोच.. महाभारतातील प्रसंग, बायबलमधील कथा, इंग्रजी शिकवण्याच्या निमित्ताने शेक्सपियरचे गाव, नाटके, सिनेमे अशी माहिती येत जाते व कथाभाग अधिक रंजक बनवते. मी जपानी भाषांतरकार असल्याने second language acquisitionमधील काही गोष्टीही प्रत्ययास येत गेल्या.

लंडनमधील खरेच लपलेले स्थलांतरितांचे जग कसे आहे, ते आपण उलगडलेत. आपले खूप आभार. असेच लिहिते राहावे.

***हर्षद फडके***, पुणे

लंडनचा एक वेगळाच, लपलेला कोपरा आपल्यासमोर उलगडणारं, तिथल्या लोकांच्या व्यथा आणि कथा मांडणारं पुस्तक! अ-निवासी भारतीयाची आपल्याला अंतर्मुख करणारी कहाणी.

लपलेलं लंडन

अरविंद रे

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# निकोला टेस्ला

माणसाच्या दैनंदिन जीवनात पूर्वी तीन मूलभूत गरजा होत्या. अन्न, वस्त्र आणि निवारा. माणूस जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगती करत गेला, तसे त्याच्या गरजांमध्येही वाढ आणि बदल होत गेला; पण अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजांमध्ये चौथी गरज वाढली आणि ती गरज खूपच महत्त्वाची झाली. ती गरज म्हणजे वीज. रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये आपल्याला विजेची इतकी सवय झाली आहे; की विजेशिवाय मानवी जीवनाची कल्पनाच करता येत नाही. वीज ही मानवाच्या वापरामध्ये सहज सुलभ व्हावी म्हणून खूप शास्त्रज्ञांनी त्यामध्ये संशोधन केले. या विद्युतशक्तीचे दोन प्रकार पडतात. ते म्हणजे ए.सी. आणि डी.सी. घरगुती वापरासाठी, व्यावसायिक वापरासाठी जास्त करून ए.सी. विद्युतशक्तीचा जास्त प्रमाणात वापर होतो. वाचकहो, घाबरू नका. मी काही इथे ती विद्युतशक्ती कशी निर्माण होते, हे सांगणार नाही. तर या ए.सी. विद्युतशक्ती आणि विद्युत चुंबकीय लहरी यांमध्ये होणारे बदल या विषयांमध्ये सखोल संशोधन करून तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या थोर वैज्ञानिक निकोला टेस्ला यांच्याबद्दल मी बोलत आहे. जी.एम.आर.टी. खोडद वेधशाळेमध्ये इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञ म्हणून काम करणारे सुधीर फाकटकर लिखित 'निकोला टेस्ला' हे चरित्र घेऊन मी तुमच्या भेटीला आलो आहे.

१८६ पानांच्या या पुस्तकाची सुरुवात निकोला टेस्ला यांच्या जन्मापासून होते. ऑस्ट्रिया-हंगेरीमधील गॅस्पिकमध्ये निकोला टेस्ला यांचा जन्म झाला. टेस्ला यांच्या जन्माची आगळीवेगळी कहाणी आहे. निकोलाची आई जॉर्जिया ही अशिक्षित होती, पण निकोलाला तिच्याकडून व्यवहारज्ञानाचे भरपूर शिक्षण मिळाले. वडील मिलुटीन


अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज सामान्य माणसाच्या
दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या - आपले अवघे आयुष्य
विद्युतविज्ञानात झोकून देणाऱ्या -
मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध!

**निकोला टेस्ला**

रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)



चर्चमध्ये धर्मगुरूची नोकरी करायचे. निकोलावर लहानपणापासून त्याच्या आईचा जास्त प्रभाव दिसून येतो. लहानपणापासून हुशार असणारा निकोला शिक्षणातसुद्धा तितकाच हुशार होता. सुरुवातीपासूनच हुशार असणाऱ्या निकोलाला विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयात विशेष आवड होती. उच्च शिक्षणासाठी त्याने इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगमधून शिक्षण घेण्यासाठी त्याचे वडील मिलुटीन यांच्याकडे वेगळाच हट्ट धरला. त्याचा तो हट्ट पूर्णही झाला. उच्च शिक्षण घेते वेळी हुशार असणाऱ्या निकोलाला अपयशाला तोंड द्यावे लागले. त्याची गाडी भरकटली. ती पुन्हा परत मार्गावर यायला वेळ लागला, पण या सर्वांत त्याला आपल्या प्रिय व्यक्तीला गमवावे लागले. पुन्हा सापडलेल्या मार्गावर चालताना निकोला यांना खूप संघर्ष करावा लागला आणि याच संघर्षातून त्यांनी निर्माण केला यशाचा महामार्ग. रोजच्या आयुष्यात वीज खेळवणाऱ्या या वैज्ञानिकाने संपूर्ण जग उजळून टाकण्यासाठी खूप मोठे योगदान दिले.

या सगळ्याची सुरुवात न्यूयॉर्कमधून झाली. थोर संशोधक एडिसन यांच्या कंपनीत निकोला विद्युत अभियंता म्हणून काम करत होता. एडिसन यांनी निकोलासोबत एक वेगळीच चेष्टा केली. स्वाभिमानी असणारे निकोला यांनी एडिसन यांची कंपनी सोडली. ते म्हणतात ना, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं. पुढे घडणाऱ्या प्रचंड मोठ्या इतिहासाची ती सुरुवात होती. राखेतून पुन्हा भरारी घेणाऱ्या निकोला यांनी यशाचे उंच उंच शिखर पार केले. त्यांचा हा जीवनपट लेखकाने सुंदर पद्धतीने या पुस्तकाच्या माध्यमातून मांडला आहे.

लेखकाने फक्त निकोला यांचे चरित्र या पुस्तकामध्ये मांडले नसून, विद्युतशक्तीचा आरंभ, त्याचा इतिहास, चुंबकीय शक्ती या सर्व गोष्टींची माहिती या पुस्तकाच्या माध्यमातून दिली आहे. निकोला टेस्ला यांच्या कार्याची सखोल माहिती आपल्याला मिळते. माझे शिक्षण इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगमधून झाले असल्यामुळे मला हे पुस्तक विशेष भावले. ज्या गोष्टींचा मी विद्यार्थिदशेत अभ्यास केला होता, त्या सर्वांची या पुस्तकाच्या माध्यमातून पुन्हा उजळणी झाली.

या पुस्तकाविषयी खूप बोलण्यासारखे आहे, पण इथे मी थांबतो. सरतेशेवटी मी एवढेच सांगेन की, संपूर्ण जग उजळून टाकणारे निकोला टेस्ला ज्यांनी स्वत:चे संपूर्ण आयुष्य संशोधनासाठी झोकून दिले, ते आम्हा सर्व अभियंत्यांसाठी प्रेरणादायी आहेत.

या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे, 'राजहंस प्रकाशन' यांनी. प्रत्येक अभियंत्याने, प्रत्येक वाचकाने वाचावे आणि प्रत्येक वाचकाच्या संग्रही असावे असे हे पुस्तक. अभियंते सुधीर फाकटकर लिखित 'निकोला टेस्ला : रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक'.

***श्रीजीवन शिवाजी तोंदले***

# काळ्यानिळ्या रेषा

'काळ्यानिळ्या रेषा' आत्मचरित्र पूर्णत: वाचले. राजहंस प्रकाशन, पुणेच्या दर्जेदार मालिकेतील उत्कृष्ट साहित्यिक मूल्याचे प्रस्तुत आत्मकथन वाचनीय व प्रेरणादायी आहे. प्रफुल्ल शिलेदार (कवी) नागपूर यांची प्रदीर्घ प्रस्तावना लेखकाच्या जीवनाचा आणि जडणघडण यांचा समतोल लेखाजोखा मांडणारी आहे. आत्मकथनातील प्रसंगानुरूप व व्यक्तिनुरूप रेखाटलेली चित्रे पुस्तकाची जान आहे. लेखकाचे मुखपृष्ठावरील वास्तविक छायाचित्र पुस्तकाचा आरसा (USP) आहे.

गावात दारोदारी भीक मागून मिळालेल्या शिळ्या अन्नावर पोटाची भूक भागविण्यासाठी आटापिटा करणे, गावात पंचक्रोशीत मेलेल्या प्राण्यांची विल्हेवाट लावणे, मृत जनावरांची कातडी सोलून विक्री करून गुजराण करणे, हमखास मांस खाणे, बांबूच्या टोपल्या बनविणे, केरसुण्या तयार करून विक्री करणे, डफडे वाजविणे अशा दलित मांग समाजात राजूचा जन्म झाला. शिक्षणाला टाळणाऱ्या, कफल्लक राहणीमान व भणंग जीवन जगणाऱ्या समाजात बालपण गेले. त्या समाजाचा आणि दारिद्र्याने खितपत जीवन जगण्याचा प्रांजळपणे व रोखठोकपणे मांडलेला जीवनपट मनाला अस्वस्थ व सुन्न करणारा आहे. संयमितपणाने कटुता, असूया, चीड, तक्रार, विद्रोह यांचे मात्र भांडवल प्रकर्षाने करण्यात आले नाही याचे अप्रूप व कौतुक.


बारीकसारीक प्रसंग तन्मयतेने कथन केले आहेत. बालपणीच्या आठवणी, प्रसंग, फजिती... मांगाऊ, भिलाऊ, तावडी आणि अहिराणी - लेवा गणबोलीत मांडले आहेत. शब्दांची पकड मात्र मनाचा ठाव घेणारी आहे. राजूच्या हलाखीच्या जीवनात व शैक्षणिक प्रगती साधण्यात निरीक्षर आई-वडील आणि शिक्षित मोठा भाऊ यांचा भरभक्कम आधार होता. रुपमाय - दूधमाय, रंगुभाई, खंड्याबाप्या, सिकंदरकाका,


हे केवळ एका चित्रकाराचे आत्मकथन नाही,
तर हा समाजातील एका वंचित वर्गाचा अस्वस्थ करणारा
उद्‍गार आहे. व्यक्तिचित्रणाच्या अंगाने जाणाऱ्या
आत्मकथनातून अंतर्मुख करणारा
अस्सल वाचनानुभव...

काळ्यानिळ्या रेषा


राजू बाविस्कर

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

विमला मावशी, धुपी, हिरा सिनकर, झिन्याकाका, चट्टा, जसुकाकू, माधुअप्पा, रवि पेंटरसारखी मंडळी आणि त्यांचे निस्सीम प्रेम, पाठराखणी व जिवापाड माया राजूच्या जीवनात दीपस्तंभाप्रमाणे अढळ स्थान राखून आहेत. खऱ्या अर्थाने राजू घडत गेला, याचा पदोपदी जाणीवपूर्वक उल्लेख सुखावणारा आहे. अशा व्यक्तींमुळेच राजूत आदर्शवत होण्याची पाळेमुळे रुजली होती. बँड विकत घेण्याची गोष्ट, स्पीकरचा बँड आणि डिग्या, अलामगिरीची आर्ट गॅलरी, बँडची कॉंपिटिशन, तमाशा, दहावीचे दिवस - करंदीकर वाड्यातील मित्र विजय व त्याचे कुटुंबीय विशेषत: माया लावणारी त्याची आई यांबाबतचे अनुभव व लेखकाने स्वत: समर्पक केलेली रेखाटने अक्षरश: भावनेला हात घालतात.

'काळ्यानिळ्या रेषा' आत्मचरित्र आगळ्यावेगळ्या पद्धतीने घट्ट वीण बांधलेली एक अनोखी गुंफण आहे. प्रस्तुत आत्मचरित्र 'अक्करमाशी', 'कोल्हाट्याचं पोर', 'बलुतं', 'उपरा', 'उचल्या', 'भंगार' आदींच्या पठडीतील आहे. सुन्न आणि अंतर्मुख करणारे आहे. सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर होणारा आणि विलक्षण अनुभूती देणारा असा त्यांचा जीवनपट चक्रावणारा व वेदनादायी आहे. राजूच्या जीवनाचा मोरपिसारा फुलल्याचा, कॅलिडोस्कोपचा आभास व अनुभूतीचा प्रत्यंतर देणारा आहे. चोपडा तालुक्यातील लासुर गावात राजू लहानाचा मोठा झाला. त्या गावात व जवळपासच्या भागात प्रतिकूल परिस्थितीत चित्रकला, मूर्तिकला, वादनकला साध्य केली. लहानपणापासूनच कुटुंबाला आर्थिक हातभार लावला. सुखी जीवन जगण्याचे स्वप्न साकार करण्याची पराकाष्ठा केली. मोठ्या भावाचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून अवघड परिस्थितीत SSC, ATDचे शिक्षण संपादन केले. कलाशिक्षक होण्यापर्यंत झेप

छप्परबंद समाजाच्या कष्टकरी, गरीब कुटुंबात जन्मलेला मुलगा. त्याचं काटेरी, कष्टप्रद अन् समस्या-आव्हानांनी भरलेलं जीवन. त्यानं घेतली यशोभरारी. हा सगळा व्यक्तिगत अन् सामूहिक प्रवास रेखाटणारं, तरुणाईसाठी मोटिव्हेशनल ठरणारं...

शून्यातून शंभराकडे...
छप्परबंद समाजातील एक यशोभरारी

डॉ. सलीम शेख

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २८०/- । (ट. ख. ₹ ५०)

घेत मजल गाठली. खडतर जीवनाचा कायापालट केला. समाजापुढे एक आदर्श राखला. जैन चॅरिटीज, जळगावद्वारा शिष्यवृत्तीचा लाभ, एकल व ग्रुप प्रदर्शने, स्तंभलेखन, ललित कला अकादमी दिल्लीसारख्या अनेक संस्थांची पारितोषिके ही सर्व राजूच्या यशस्वी जीवनाची शिखर गाठणारी बलस्थाने आहेत.

कुटुंब एकसंध राखून, समाजाची प्रतिष्ठा उंचावत राजू बाबुराव बाविस्कर यांचे अपार कष्ट, हिंमत, आकर्षित करण्याची व विश्वास राखण्याची नम्र वृत्ती आणि पराकोटीची जिद्द यांना मानाचा मुजरा! उत्कृष्ट लेखक, चित्रकार व वादक या नात्याने मनस्वी अभिनंदन! अधिकाधिक प्रगती व उन्नती साध्य करण्यासाठी भरघोस शुभेच्छा!!

***राजगणेश परशुराम घुमारे***, पुणे

## मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी

- सवाष्ण — किंमत : ₹ ३८०/-
  डॉ. क्षमा गोवर्धने शेलार
- १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...! — किंमत : ₹ २४०/-
  सुरेश वांदिले
- द सीक्रेट मिशन — किंमत : ₹ २६०/-
  राधिका कुलकर्णी
- विवाह नाकारताना — किंमत : ₹ ४३०/-
  विनया खडपेकर
- बाय गं — किंमत : ₹ ४८०/-
  विद्या पोळ-जगताप
- प्रिय पालक — किंमत : ₹ ३२०/-
  डॉ. वैशाली देशमुख
- गोंदणखुणा — किंमत : ₹ ३००/-
  डॉ. प्रिया निघोजकर
- दौशाड — किंमत : ₹ ६००/-
  डॉ. नंदकुमार राऊत

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा
**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**
**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**‘राजहंस ॲप’**

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता
Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com । Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अद्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.




पालकांनी मुलांसोबत
संवादासाठी सुरू केलेलं बोलणं,
हमखास विसंवादाचं वळण घेतं.

हा तिढा सोडवायचा कसा?

प्रक्रिया सोपी नाहीच,
पण प्रयत्नसाध्य नक्की आहे.

त्यासाठी सादर आहे,
एका बालरोगतज्ज्ञ समुपदेशिकेचे
अनुभवाचे बोल...

**प्रिय पालक**
डॉ. वैशाली देशमुख

---

निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार,
मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य,
स्त्री-संवेदनेशी जोडलेल्या घटना-प्रसंगांची
चलतचित्रं किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं
स्वत:ला नि:संदर्भ करून केलेलं आत्मचिंतन.

एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या
सखीला कधी मनोगत तर कधी हृद्गत सांगावं,
तसा आशय सांगणारा लेखसंग्रह.

**गोंदणखुणा**
डॉ. प्रिया निघोजकर



Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48


‘कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले;
तरी डरायचं नाही.’
असा संदेश देणारी
वेलवर्गीय वनस्पती - ‘दौशाड’!

तिचाच आदर्श घेऊन
माणदेशातील माणसं
हिमतीनं जगत असतात.

त्यांची कहाणी सांगणारं...

दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक ‘राजहंस’ प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**